# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ४

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-४ /७/२०१४

प्रति,
मा.------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती **सभा क्र.-४ मंगळवार दि. ८/७/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**मंगळवार दिनांक- ८/७/२०१४ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| १८ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात इच्छुक भुलतज्ञ डॉक्टारांची सहा महिन्याकरीता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १९ | अहमदनगर महानगरपालिकेचे फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. सुरेश विलास घोलप यांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २० | अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर) या पदावर स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २१ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात रक्त संक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती बाबतचे दरमहा मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २२ | अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेस व दरमहा मानधन वाढीबाबत निर्णयाकरीता मिळणे ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| २३ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्नीशियन , स्टाफ नर्स या पदांवर तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २४ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका या पदांवर अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २५ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदांवर अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २६ | अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका या पदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नुसार रेश्मा शरद कार्ले यांची सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २७ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नुसार श्री. डहाळे सौरभ भाउसाहेब यांची सहा महिन्याकरीता केलेल्या मानधनावर पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २८ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नुसार डॉ.गणेश बी.माने यांची सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २९ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी डॉ. सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३० | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर सहा महिन्याकरीता केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३१ | अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदांवर अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३२ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१४-२०१५ पारगमन शुल्क संकलन कामी अभिकर्ता नेमणूक बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३३ | अर्जदार श्री. महेंद्र रमेश छाजेड, रा. इंडस्ट्रीज इस्टेट नगर-पुणे रोड,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-४, वॉर्ड क्रमांक २४, बील क्रमांक ३७१/१ आकारणी केलेली सन २००३ ते २०१४ अखेर पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३४ | महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या भुखंडास आकारणी करण्यात आलेल्या प्रभाग समिती क्रमांक १वॉर्ड क्र.५७ मालमत्ता धारकाचे बील क्रमांक २२६,२२७,२२८,२२९,४५९,५५०,६२९,६३० या भुखंडास आकारणी कराची सन १९९५ ते २०१४ अखेर रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ३५ | अर्जदार भरत हरिभाउ भोर, रा. सावेडी हडको, अ.नगर यांना मोकळया प्लॉटवर नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-१,वॉर्ड क्रमांक ६४, बील क्रमांक ७६९ कर आकारणी केलेली सन २००७ ते २०१३ अखेर पाणी पट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| ३६ | अर्जदार प्रकाश टिकाराम बोरोल , रा.इंदिरानगर,केडगाव,अ.नगर यांना प्रभाग समिती क्रमांक-४,वॉर्ड क्रमांक ३४, बील क्रमांक ४५२ कर आकारणी केलेली सन २०१३-२०१४ अखेर घरपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३७ | मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६ दि.४/५/२०१३ अन्वये अर्जदार अफाली फार्मासिटीकल्स लिमिटेड, रा. बुरूडगांव रोड,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-४,वॉर्ड क्रमांक २१, बील क्रमांक २४९ आकारणी केलेली सन २००३-२०१३ अखेर पाणी पट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत फेरसादर. |
| ३८ | अहमदनगर महानगरपालिकेच्या हददीमध्ये रस्ता बाजू मांडणी फी,स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर ई - निवीदा पध्दतीने देणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३९ | श्री. मुलतानचंद बोरा, ट्रस्ट संचालित अमरधाम स्मशानभुमी येथील विद्युत दाहिनीचे बील अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४० | अहमदनगर महानगरपालिकेच्या अहमदनगर शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदी करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास पुढील सहा महिन्याकरीता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये२,९६,०००/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४१ | अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ संदर्भात मे.NATIONAL GREEN TRIBUNAL,PUNE यांनी दिनांक ३०/५/२०१४ रोजी दिलेल्या अंतरीम आदेश मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन देणेबाबत |
| ४२ | अर्जदार श्री. भागवत विश्वनाथ व्यवहारे, श्री. विलास भाउसाहेब लामखेडे , रा. निंबळक ता.नगर, जि.अ.नगर यांचे सीना नदी पात्रामधील महानगरपालिकेचे मालकीच्या विहीरीमधून पाणी देणेस परवानगी देणेबाबत. ऑफिस रिपोर्ट. |
| ४३ | मा.स्थायी समिती ठराव क्र. १३ दि.२/६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत |
| ४४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधी तज्ञ ) म्हणून ॲडव्होकेट याची दरमहा मानधनावर पॅनलवर नेमणुकी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- १८ ते ४४ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- १८ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- १८ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात इच्छुक भुलतज्ञ डॉक्टारांची सहा महिन्याकरीता ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना जा.क्र./वर्क. १६७ दिनांक ४/१/२०१४

संदर्भ :- मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील कै. बा.दे.दवा. व सुतिका गृह जा.क्र.६५९ दिनांक ८/११/२०१३ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती की, मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील कै. बा.दे.दवा. व सुतिका गृह जा.क्र.६५९ दिनांक ८/११/२०१३ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै. बा.दे.दवा. व सुतिका गृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करीता वैद्यकीय अधिकारी बधिरिकरण तज्ञांची आवश्यकता असते. भुलतज्ञांचे पद आस्थापना सुचीवर नाही.त्याकरीता मा. स्थायी समिती ठराव नं.८१ दि.१२/१/२०११ अन्वये जा.क्र.आस्थापना ३६२०दिनांक ४/२/२०११ अन्वये दि.६/१/२०११ ते ५/१/२०१४ अखेर भुलतज्ञांची पॅनलशिपवर मानधनावर नेमणूक करण्यात आलेली असुन सदरची मुदत दि.५/१/२०१४ रोजी संपत आहे. सध्या भुलतज्ञांना प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रू.५००/-, मेजर ऑपरेशन करीता रू.१०००/-, नाईट अॅण्ड हायरिस्क केसेस करिता रू.१५००/- मानधन अदा करण्यात येते . कै. बा.दे.दवा. व सुतिका गृहामध्ये प्रामुख्याने गरीब व मध्यम वर्गातील रूग्ण औषधोपचार व प्रसुति करीता येतात. त्यामुळे भुलतज्ञा अभावी ऑपरेशन करीता खाजगीरित्या भुलतज्ञांना कॉल केल्यास त्यांची भुल दिल्याबद्दलची फी रूग्णांना परवडणारी नसते. त्यामुळे रूग्णांची व पर्यायाने हॉस्पीटलची गैरसोय होईल. तरी हॉस्पीटलच्या दृष्टीने इमर्जन्सीच्यावेळी रूग्ण भुलतज्ञा अभावी दाखल करून घेणे धोक्याचे होईल व त्यामुळे हॉस्पीटलमध्ये दाखल होणा-या रूग्णांच्या संख्येवर परिणाम होण्याची दाट शक्यता लक्षात घेता हॉस्पीटल व रूग्णांच्या दृष्टीने भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करणे गरजेचे आहे. तसेच सदरची नेमणूक ही पॅनलशिपवर असुन भुलतज्ञांना अदा करण्यात येणारी रक्कम ही मानधन नसुन त्यांनी केलेल्या केसस प्रमाणे अदा करण्यात येते. त्यामुळे त्यांची नेमणूक करतेवेळी तांत्रिक खंड दिल्यास खंड दिलेल्या कालावधीमधील केसेसची रक्कम अदा करणे अडचणीचे होते. तरी दि.०६/०१/२०१४ पासुन दि.०५/०१/२०१७ अखेर तीन वर्षाकरिता भुलतज्ञ डॉक्टरांची पॅनलशिपवर प्रत्येक मायनर ऑपरेशन करिता रू.५००/- मेजर ऑपरेशन करीता रू.१०००/-, नाईट अॅण्ड हायरिस्क केसेस करिता रू.१५००/- याप्रमाणे सोबतच्या यादीतील अहमदनगर शहरातील इच्छुक भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणूक करण्यासाठी मंजुरी मिळणेबाबतच्या प्रस्ताव आदेशार्थ सविनय सादर. " असे नमुद केलेले आहे.

वरील मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी "प्रस्तावीत 'अ' प्रमाणे पुढील ३ वर्षाकरीता भुलतज्ञांची पॅनलशिपवर ऑनकॉल बेसीसवर नियुक्ती करणेस व आवश्यक कार्यवाही आस्थापना विभागास आदेशार्थ सादर. " असे नमुद करून अभिप्राय दिलेला आहे.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी वरील सादर केलेल्या प्रस्तावासोबत भुलतज्ञ डॉक्टर पॅनल नेमणूक करणेकामी इच्छुक भुलतज्ञांची यादी सोबत जोडलेली असुन त्यांची नांवे पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| १ | डॉ.सौ. सायंबर |
| २ | डॉ.श्री. सचिन लांडगे |
| ३ | डॉ.श्री. मिलींद पोळ |
| ४ | डॉ. श्री. शशांक मोहळे |
| ५ | डॉ.श्री.महादेव रंधाळे |
| ६ | डॉ.श्री. शिरिष कुलकर्णी |
| ७ | डॉ.सौ. संगिता कुलकर्णी |
| ८ | डॉ.श्री.के.टी. कलवाणी |
| ९ | डॉ.सौ. दिपाली फाळके |
| १० | डॉ.श्री. प्रतिभा आर. भोसले |
| ११ | डॉ.श्री. संदिप नळे |

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर भुलतज्ञ डॉक्टरांची मंजुर पदे नसल्यामुळे नागरिकांना वैद्यकीय सेवा तातडीने उपलब्ध करून देणे आवश्यक असल्यामुळे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांनी वेळोवेळी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.८३ दिनांक १२/१/२०११ व मा. स्थायी समिती ठराव क्र.४५ दिनांक २३/९/२०११ व मा.स्थायी समिती ठराव क्र. ३ दिनांक ८/४/२०१३ च्या पुर्व मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र. आस्था. ३६२० दिनांक ४/२/२०११ व २१४८ दिनांक २९/१०/२०११ व १४५६ दि.१४/६/२०१३ अन्वये संबंधितांची कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ यापदी अटी व शर्ती प्रमाणे दिनांक ०५/०१/२०१४ अखेर तीन वर्षाकरीता प्रत्येक मेजर ऑपरेशनसाठी रू.५००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी रूपये २५०/- यावर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असुन त्यामध्ये तद्नंतर मा.प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचेकडील प्रस्तावावरील मा. स्थायी समिती ठराव क्र.१४ दिनांक ८/४/२०१३ च्या पुर्व मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने सदर कालावधीतील प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी रू.५००/- व प्रत्येक मेजर ऑपरेशनसाठी रू.१०००/- व प्रत्येक नाईट ॲण्ड हायरिस्क करीता रू.१५००/- याप्रमाणे मानधनात वाढ करण्यात आलेली आहे.

संबधितांची सदरच्या अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या तीन वर्षाच्या पॅनलशिपवरील करारबध्द नियुक्ती कालावधीतील नियुक्तीची मुदत ही दिनांक ०६/०१/२०१४ रोजी पासुन समाप्त होणार होती.

त्यावेळी अहमदनगर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक सन २०१३ ची प्रक्रिया अस्तित्वात असल्याने दिनांक १६/१२/२०१३ पर्यत आचारसंहिता लागु होती. त्यामुळे उपरोक्त प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेस तांत्रिक अडचणी निर्माण झालेली होती. त्यामुहे कै.बा.दे.दवा. अत्यावश्यक सेवेचा विचार होवुन कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या इच्छुक भुलतज्ञ डॉक्टारांची ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र. आस्थापना ६५९० दिनांक ३१/१२/२०१३ अन्वये दिनांक ६/१/२०१४ पासून सहा महिन्याकरीता करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.

यापुर्वी फिरता दवाखान्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी कंत्राटी करारानुसार दरमहा करारबध्द नियुक्ती मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे ठरावामध्ये नमुद केलेले आहे.

तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातुन फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्य असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी , लॅब टेक्नीशियन , नर्सेस इ.चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुर्ननेमणूक एक दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मा. स्थायी समितीकडे पाठविण्यांत यावेत. असे नमुद केलेले आहे.

तरी मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवाखाना यांचे कडील संदर्भिय जा.क्र. कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह ६५९ दि.८/११/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे नागरिकांच्या वैद्यकीय सेवेच्या दृष्टीकोनातुन तातडीने अत्यावश्यक सेवेचा विचार होवुन अंतर्गत खास बाब म्हणून जा.क्र.आस्थापना ६५९०दि. ३१/१२/२०१३ अन्वये कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ यापदी इच्छुक डॉक्टारांची अटी व शर्तीनुसार **१. डॉ.सौ. सायंबर, २. डॉ.श्री. सचिन लांडगे, ३. डॉ.श्री. मिलींद पोळ, ४. डॉ. श्री. शशांक मोहळे,५. डॉ.श्री.महादेव रंधाळे,६.डॉ.श्री. शिरिष कुलकर्णी,७.डॉ.सौ. संगिता कुलकर्णी,८. डॉ.श्री.के.टी. कलवाणी,९. डॉ.सौ. दिपाली फाळके,१०. डॉ.श्री.प्रतिभा आर. भोसले,११.डॉ.श्री. संदिप नळे** यांची **दि.०६/०१/२०१४पासुन सहा महिन्याकरीता** ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर **प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रू.५००/-, मेजर ऑपरेशन करीता रूपये १०००/- नाईट ॲण्ड हायरिस्क केसेस करीता रू.१५००/-** याप्रमाणे केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापनाप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- भुलतज्ञ डॉक्टारांची ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- हे भुलतज्ञ आहेत का ?

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- होय

मा.सभापती साहेब :- वेळेवर येतात का?

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- कार्योत्तर मंजूरी आहे का ? ही इतकी वेळेवर का देता.

मा.सभापती साहेब :- आधी का सादर करीत नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- जर आम्ही नामंजूर केले तर काय करणार

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- जर काम समाधानकारक आहे नियुक्ती देतो.

मा.सभापती साहेब :- मुदत संपती आधी मग नंतर मंजूरी करीता पाठवता कसे काम करणार.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- आस्थापानाने जानेवारी २०१४ पाठवला परंतू स्थायी समिती नसल्याने व मागील सभेने तहकुब ठेवला. ४ मार्चला स्थायी समिती सुरू झाली पहिली सभा बजेटची झाली.

मा.सभापती साहेब :- पुर्ननियुक्ती द्यावी व स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी घ्यावी अशी तरतुद आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- आम्ही परवा जनरल बोर्डमध्ये बोललो ते डॉक्टर हेच आहेत. डॉ.सुरेश घोलप डॉक्टर आहेत हे पेशंटला काहीही बोलतात.

मा.श्री.सचिन जाधव :- पेशंटला काहीही बोलतात.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- यात वाढ किंवा कमी करू शकतो.

मा.सभापती साहेब :- आपण मान्यता देउ पण त्यांना वागणे सुधारायला सांगा.

मा.श्री.शेख फैयाज :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार कार्योत्तर मंजूरी साठी असल्याने सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात इच्छुक भुलतज्ञ डॉक्टारांची ऑनकॉल बेसीसवर पॅनलशिपवर अटी व शर्ती नुसार १. डॉ.सौ. सायंबर, २. डॉ.श्री. सचिन लांडगे,३. डॉ.श्री. मिलींद पोळ, ४.डॉ.श्री.शशांक मोहळे,५.डॉ.श्री.महादेव रंधाळे,६.डॉ.श्री.शिरिष कुलकर्णी,७.डॉ.सौ. संगिता कुलकर्णी,८.डॉ.श्री.के.टी.कलवाणी,९.डॉ.सौ.दिपाली फाळके,१०. डॉ.श्री.प्रतिभा आर. भोसले, ११. डॉ. श्री. संदिप नळे यांची जा.क्र.आस्थापना ६५९०दि.३१/१२/२०१३अन्वये दि.०६/०१/२०१४पासुन सहा महिन्याकरीता प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रू.५००/-,मेजर ऑपरेशन करीता रूपये १०००/- नाईट ॲण्ड हायरिस्क केसेस करीता रू.१५००/-याप्रमाणे मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.शेख फैयाज सही /-

अनुमोदक :- मा. श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४

विषय क्रमांक- १९ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- १९ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. सुरेश विलास घोलप यांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना जा.क्र./वर्क. १७१दिनांक २९/१/२०१४

संदर्भ :- १. डॉ. सुरेश विलास घोलप यांचा दिनांक १२/१२/२०१३ रोजीचा अर्ज

२.मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील कै. बा.दे.दवा. व सुतिका गृह जा.क्र.७८ दिनांक २०/१२/२०१३ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती की, मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील कै. बा.दे.दवा. व सुतिका गृह जा.क्र.७८ दि.२०/१२/२०१३ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने अहमदनगर शहरामध्ये फिरता दवाखाना सुरू करण्यात आलेला आहे. सदर फिरत्या दवाखान्यामुळे दारिद्रय रेषेखालील व गलीच्छ वस्तीत जाउन आरोग्य बाबत जनजागृती व नागरिकांना आरोग्य सेवा पुरविली जाते. सदरच्या फिरत्या दवाखान्याकरीता डॉ.श्री.सुरेश विलास घोलप यांची जा.नं. आस्था./कंत्राटी करार नेमणुक २२४३ दि.१५/७/२०१३अन्वये सहा महिन्याकरीता वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली होती. सदर आदेशाची मुदत दि. १५/०१/२०१४ रोजी संपुष्टात येत आहे. त्यांनी संदर्भ क्र.२ नुसार पुढील सहा महिन्याकरीता पुनर्नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे. तसेच त्यांनी आतापर्यंत केलेल्या कामाचा तपशिल सोबत जोडुन दिलेला आहे. अहमदनगर महानगरपालिकेत वैद्यकीय अधिका-यांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे फिरत्या दवाखान्याकरीता वैद्यकीय विलास घोलप यांचे काम समाधानकारक आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे एक दिवसाचा तांत्रिक खंड देउन दि. १८/०१/२०१४ ते १७/०७/२०१४ अखेर पुनर्नेमणुक देणेस शिफारस आहे. तथापि आदेशार्थ सादर. असे सुचित केलेले आहे.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह जा.क्र.४६दि.१८/६/२०१३ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषांने अ.नगर मनपाच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे डॉ.श्री.सुरेश विलास घोलप यांची जा.क्र. आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक२२४३ दि.१५/७/२०१३ अन्वये दि.१६/७/२०१३ पासुन सहा महिन्याकरिता दरमहा रू.२००००/- या मानधनावर कै.बा.दे.दवाखाना येथे करारबध्द नेमणूक करण्यात आलेली आहे.

डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची फिरता दवाखाना करीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी कंत्राटी करारानुसार अटी व शर्तीप्रमाणे दरमहा मानधनावर सदर केलेल्या सहा महिन्याचा करारबध्द कालावधतील नियुक्तीची मुदतही दि. १५/०१/२०१४ रोजी समाप्त झालेली आहे.

सदर कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह ४६ दिनांक १८/६/२०१३ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ. सुरेश विलास घोलप

यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक २२४३ दि.१५/७/२०१३ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी करारबध्द नेमणूक आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे दिनांक १६/०७/२०१३ पासून सहा महिन्याकरीता केलेल्या कंत्राटी करारबध्द मानधनावरील नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव जा.क्र. आस्था.८३ दिनांक १६/७/२०१३ अन्वये मा. स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता.सदरच्या कालावधीतील अटी व शर्ती प्रमाणे डॉ. सुरेश विलास घोलप यांची केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीच्या प्रस्तावास मा.स्थायी समिती ठराव क्र.१२५ दिनांक ३१/०८/२०१३ अन्वये ठराव पारित होवुन कार्योत्तर मंजुरी मिळालेली आहे."

यापुर्वी फिरता दवाखान्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदी कंत्राटी करारानुसार दरमहा करारबध्द नियुक्ती मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र.१३ दिनांक ३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे ठरावामध्ये नमुद केलेले आहे.

तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातून फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन, नर्सेस इ.चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुर्ननेमणूक एक दिवस तांत्रिक खंड देवुन त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मा. स्थायी समिती कडे पाठविण्यात यावेत." असे नमुद केलेले आहे.

तरी मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील कै. बा.दे.दवा. व सुतिका गृह यांचे उपरोक्त संदर्भिय क्र.२ च्या जा.क्र.७८दिनांक २०/१२/२०१३ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता डॉ. श्री. सुरेश विलास घोलप यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी सदर केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील करारबध्दाची मुदत समाप्ती नंतर त्यांना तांत्रिक खंड देवून दिनांक १८०/१/२०१४ पासून सहा महिन्याकरीता रूपये २०,०००/- (रूपये वीस हजार मात्र) या दरमहा मानधनावर जा.क्र. आस्था. / कंत्राटी करारबध्द नेमणूक ६६८२ दिनांक २०/०१/२०१४अन्वये केलेल्या करारबध्द कालावधीतील पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता मा.स्थायी समिती ठराव क्र.१३ दिनांक ३०/४/२०१० अन्वयेचा पारित झालेल्या ठरावाचया अनुषंगाने सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त , मा.उपायुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापनाप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- फिरता दवाखाना कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी यांची मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बारेकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- मान्यता दिली तर व्यवस्थीत वागायला सांगा.

आरोग्याधिकारी डॉ. राजूकर :- त्यांना वर्तणूक चांगली करण्याची स्पष्ट सुचना दिली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार कार्योत्तर मंजूरीसाठी असल्याने सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील सहा महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव सहा महिन्यांच्या कालावधीत  पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ. सुरेश विलास घोलप यांची अटी व शर्तीनुसार जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ६६८२दि.२०/०१/२०१४अन्वये दिनांक १८०/१/२०१४पासून सहा महिन्याकरीता रू.२०,०००/-(रूपये वीस हजार मात्र)या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेल्या या कार्योत्तर मंजूरी चा कालावधी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील सहा महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. त्यास याच ठरावाव्दारे मंजूरी देण्यात येत आहे. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या वाढीव सहा महिन्यांच्या कालावधीत  पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर नव्याने भरतीबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सचुक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.शेख फैयाज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- २० मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- २० मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर) या पदावर स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना जा.क्र./वर्क. १७२ दिनांक २९/१/२०१४

संदर्भ :- श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांचा दिनांक १३/०१/२०१४ रोजीचा अर्ज

विनंती की, श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांनी दिनांक १३/०१/२०१४ रोजी अर्ज देवून त्यामध्ये "स्वंयचलित अभियंता (ऑटोमोबाईल इंजिनियर) या पदावर मोटार व्हेईकल विभागामध्ये कार्यरत आहे. मोटार व्हेईकल विभागामध्ये वाहनांचे देखभाल दुरूस्ती व मेन्टनंसचे इत्यादी कामासाठी नेमणूक आहे. माझे नेमणूक दि.१८/०६/२०१३ ते १७/१२/२०१३ रोजी संपुष्टात येत आहे. या विभागाकडे पुन्हा काम करण्याची इच्छा आहे. त्या अनुषंगाने मुदतवाढ देण्यात यावी. असे नमुद करून विनंती केलेली आहे.

मा.मॅकेनिकल इंजिनियर यांचे कडील जा.क्र. मोटार व्हेईकल विभाग ३ दिनांक १०/४/२०१३ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर) या पदावर स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्तीनुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिनयाकरीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर मोटार व्हेईकल विभागामध्ये कराराबध्द पुर्नेनेमणूक करणेस पुर्व मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव निर्णयासाठी इकडील जा.क्र.आस्था.वर्क .३८ दिनांक १७/५/२०१३ अन्वये मा. स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेल्या होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ११७ दिनांक १०/६/२०१३ अन्वयेच्या मंजुरीने मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर) या पदावर श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवून दिनांक १८/६/२०१३ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर पुर्नेनियुक्ती ही मोटार व्हेईकल विभागामध्ये करण्यात आलेली होती.

श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची सदरची वरील केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील करारबध्द पुर्नेनियुक्ती कालावधीतील नियुक्तीची मुदतही दि.१७/१२/१३ रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

आस्थापना कायम सुचीवर अहमदनगर महानगरपालिकेच्या मोटार व्हेईकल विभागाकरीता कनिष्ठअभियंता(ॲटोमोबाईल इंजिनियर)हे पद मंजूर नसल्यामुळे मोटार व्हेईकल विभागामध्ये अ.नगर महानगरपालिकेच्या सर्व वाहनाची दुरूस्ती कामी अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत आहे.

तरी सद्यस्थितीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात व्यवस्था निर्माण करून अंतर्गत खास बाब म्हणून श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांचे दिनांक १३/१/२०१४ रोजीच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर) या पदावर श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्तीनुसार तांत्रिक खंड देवून जा.क्र. आस्थापना / कंत्राटी करारबध्द नेमणूक ७०५१ दिनांक २२/१/२०१४ अन्वये दिनांक २३/१/२०१४ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर मोटार व्हेईकल विभागामध्ये केलेल्या करारबध्द पुर्नेनेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब, मा. उपायुक्त साहेब यांचे मंजुरीने मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापनाप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मोटार व्हेईकल विभाग कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर) या पदावर मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बारेकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- कंत्राटी तत्वावर नाही. फक्त मानधनावर अशी ही नियुक्ती आहे. त्यामुळे फक्त मानधनावर असे लिहावे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- जागा कमी पडते वाहने जास्त आहेत. इंजि. कमी आहेत. आस्थापना प्रमुख माहिती सांगा.

आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- ॲटोमोबईल इंजिनियरचे पद नाही

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आकृतीबंधवर किती पदे आहे.

आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- एक पद आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :-कार्योत्तर मंजूरी कशाला घ्यावी याचे निकष आहे का नाही.

मा.सभापती साहेब :- आपण हे विषय लवकर का सादर करीत नाही.प्रत्येक विभाग प्रमुखांनी मुदत संपायच्या आधी १ महिना प्रस्ताव पाठवायला हवा

मा.श्री. सचिन जाधव :- हे बदलेले पाहिजे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- महापालिकेची अनेक वाहने आहेत. तेथे दुरूस्तीअभावी काम अडून पडते. नागरीकांना सेवा देणे महत्वाचे आहे. ॲटोमोबाईल इंजिनियरच्या संख्ये मध्ये वाढ करा.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- मा.सभापती साहेब आपल्या कडे आज अर्ज दाखल झाला आहे,त्यावर आपण काय निर्णय घेणार.

मा.सभापती साहेब :- तो अर्ज श्री.जयेश वसंत कोके यांचा असून ते इवळे गल्ली,माळावाडा,अहमदनगर येथे राहणारे आहेत असे अर्जात नमुद आहे.तो अर्ज या विषयासोबत सभेच्या निर्णयार्थ ठेवण्याचा आदेश अर्जावर दिला आहे.तो अर्ज वाचा.

अर्ज वाचण्यात आला.

मा.श्री.दत्तात्रय कावरे:-हा अर्ज आलेला आहे.आपल्याला ऑटोमोबाईल इंजिनियरची आवश्यकता आहे.त्यामुळे या अर्जदाराची नेमणूक ६ महिन्यांकरीता मानधन तत्वावर तात्पुरती करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- यावर निर्णय घ्यावा.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- वाहनांची संख्या वाढल्याने श्री.जयेश वसंत कोके यांच्या या अर्जा नुसार त्यांची ६ महिन्यांकरीता मानधनावर तात्पुरती नेमणूक करावी.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- अर्जदार जयेश वसंत कोके यांची मानधनावर तात्पुरती नेमणूक करावी.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट मंजूर . तसेच अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर) या पदावर श्री.जयेश वसंत कोके यांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता मानधनावर नियुक्ती करण्यात यावी.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर) या पदावर स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची अटी व शर्ती नुसार जा.क्र. आस्थापना / कंत्राटी करारबध्द नेमणूक ७०५१ दिनांक २२/१/२०१४ अन्वये दिनांक २३/१/२०१४ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी आज स्थायी समिती समोर आलेल्या अर्जानुसार करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजिनियर) या पदावर श्री.जयेश वसंत कोके यांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरिता मानधनावर नियुक्ती करण्यात यावी यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. दत्तात्रय कावरे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- २१ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- २१ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात रक्त संक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती बाबतचे दरमहा मानधन वाढविणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह जा.क्र.५६७ दि.१७/९/२०१३

संदर्भ :- १. आस्थापना विभाग जा.क्र.३५३१ दिनांक २६/८/२०१३

२. डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांचा दिनांक १६/८/२०१३ रोजीचा अर्ज

उपरोक्त विषयानुसार विनंतीपुर्वक प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संदर्भ क्रमांक.२ नुसार डॉ.सौ.रूपाली आनंद कुलकर्णी यांनी दिनांक १६/८/२०१३ रोजी अर्ज सादर करून त्यामध्ये रक्तपेढी विभागामध्ये रक्त संक्रमण अधिकारी या पदाचे रक्तपेढी या विषयावरील शैक्षणिक पात्रता, सध्याचे कामाचे स्वरूप पाहता व सध्याची महागाईचा विचार करता मिळणारे रू.२५०००/- हे अत्यंत अल्प स्वरूपाचे असल्याने सध्याच्या मानधनावर ३०% मानधन वाढवुन मिळावे असा स्वरूपाचा अर्ज केलेला आहे. सदरच्या अर्जावर संदर्भ क्रमांक १ नुसार डॉ.सौ. रूपाली कुलकर्णी यांचा अर्जाचा विचार करून किती मानधन वाढवुन द्यावे असा आस्थापना विभागाने या बाबतीत अहवाल देणेबाबत सुचीत केलेले आहे.

डॉ.सौ.रूपाली कुलकर्णी यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी नेमणूक जा.क्र.१९४दि.२५/४/२०१२अन्वये रक्तपेढी विभागामध्ये रक्त संक्रमण अधिकारी म्हणून कंत्राटी करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. डॉ.सौ.कुलकर्णी यांनी रक्तपेढी विभागाचा परवाना निलंबित झालेला असताना रक्तपेढी विभागाचे अन्न व औषध प्रशासनाच्या नियमानुसार नुतनीकरण करणे,रक्तपेढी विभागाचा परवाना पुनःश्च मिळविणे तसेच रक्तपेढी विभाग पुर्ववत सुरू करणेकामी रक्तपेढी प्रमुखाच्या सर्व जबाबदा-या पार पाडलेल्या आहेत. तसेच सध्या रक्तपेढी विभाग सर्व तांत्रिक काम (रक्तजुळणी, रक्तपिशवी वितरण,रक्तसंकलण,रक्तपिशवी चाचण्या, रक्तगटाचासाठा मेंन्टेल करणे इ.) रक्तपेढीमधील दैनंदिन कामाचा एक भाग म्हणून प्रशासकीय काम सध्या त्या पाहत आहेत. तसेच लवकरच रक्तपेढी विभागामध्ये रक्त विघटन प्रयोगशाळा सुरू करण्यात येणार आहे. प्रयोगशाळे करिता त्यांच्या रक्तविघटन प्रक्रियेबाबत असलेल्या अनुभवाचा मनपास उपयोग होणार आहे.

तरी वरीलप्रमाणे डॉ.सौ. कुलकर्णी यांचे कामाचे स्वरूप, त्यांचा रक्तपेढी कामाचा अनुभव व त्यांची शैक्षणिक पात्रतेचा विचार करता विशेष विषयतज्ञ म्हणून त्यांना सहा महिन्यांकरिता करारबध्द नियुक्तीबाबत सध्याच्या दरमहा मानधनाचे २०% म्हणजेच रू.५०००/- दरमहा मानधन वाढवुन देणे उचित वाटते. रिपोर्ट पुढील कार्यवाहीस्तव संबंधीत विभागस आदेशार्थ सविनय सादर. **/अ**

येणेप्रमाणे मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मुख्य वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे प्रस्तावीत २०% मानधन वाढ नियमीत एम.बी.बी.एस. वेतनावरील डॉक्टर पदाच्या एक वर्ष कालावधी पुर्ण झालेनंतर नियमीत पगारवाढीपेक्षा जास्त घेत असेल तर एक वर्ष कालावधीकरीता कंत्राटी नेमणूकीसाठी १० ते १५% मानधन वाढ देणे उचित राहील याबाबतीत आस्थापना विभागाने नियमीत पगार वाढ व कंत्राटी मानधन वाढ प्रत्येक वर्षी यांचा तक्ता

अभ्यासासाठी  सादर करून नियमीत वैदयकीय अधिकारी वेतनवाढीपेक्षा कमी वाढ देणे योग्य राहील तरी मान्यतेस्तव सादर.

यावर सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.प. आणि मु.ले.अ.  यांचा अभिप्राय घेणे

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की,  MOH यांचे अभिप्रायाप्रमाणे आस्थापना विभागाने नियमित पगार वाढ व कंत्राटी मानधन वाढ यांचा तक्ता प्रथम तयार करून प्रकरण सादर करावे.

--०००--

आस्थापना विभाग  दिनांक २३/९/२०१३

सादर,

विनंती  अहवाल सादर करण्यात येतो की, डॉ.सौ. रूपाली  आनंद कुलकर्णी यांचे दिनांक १६/८/२०१३ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात रक्त संक्रमण अधिकारी  तथा  व वैद्यकीय अधिकारी या पदाचे दरमहा मानधन वाढविणे बाबत विषयावर सविस्तर अहवाल सादर करणेबाबत नमुद करून मा.प्र.आरोग्याधिकारी यांना जा.क्र. आस्थापना ३५६१ दिनांक २६/८/२०१३ अन्वये पत्र देवून विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुसार कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह जा.क्र५६७ दिनांक १७/९/२०१३ अन्वये वरील उपरोक्त प्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागासाठी सद्यस्थितीमध्ये आस्थापना कायम सुचीवरील एम.बी.एस.एस. ही शैक्षणिक पात्रता धारक वैद्यकीय अधिकारी या पदाचे एकत्रित वेतनानुसार व तद्नंतर कायम पदी झाल्यानंतर सहाव्या वेतन आयोगानुसार दरमहा वेतन (पगार) खालील प्रमाणे अदा होईल.

| अ क्र | आस्थापना सुची वरील पदनाम | एकत्रित वेतन (मा.महासभा ठराव क्र.६ दिनांक २२/६/२०१० नुसार ) | | | डॉ. कुलकर्णी यांचे अर्जाच्या अनुषंगाने मानधन वाढविणे बाबत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी ( एम.बी.बी.एस.) | पहिले वर्षे | दुसरे वर्षे | तिसरे वर्षे | मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफाशश केल्यानुसार |
| | | १५०००/- | १६०००/- | १७०००/- | |
| | | आस्थापना कायम सुचीवर कायम स्वरूपी नियुक्ती नुसार वेतनश्रेणी प्रमाणे होणारे सद्यस्थिती दरमहा एकुण (वेतन) रूपये. | | | २५,०००/- = २०% प्रमाणे ५,०००/-= **एकुण ३०,०००/-** |
| | | मुळ वेतन | ग्रेड पे. | एकुण पगार | मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी शिफारश केल्यानुसार |
| | | ९३०० | ५४०० | **२८,३३०/- (अ)** | २५,०००/-= १०% प्रमाणे २,५००/- **एकुण २७,५००/- (ब)** |

सदर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात रक्त संक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी या पदाचे वरील दर्शविल्याप्रमाणे अवलोकन होवुन दरमहा मानधन किती निश्चित करून वाढविणे या बाबत चर्चा विनियम होवनु निर्णय झाल्यास सदरची बाब ही आर्थिक खर्चाशी निगडीत होत असल्याने सदरच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेसाठी मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता सदरचा प्रस्ताव हा पाठविणे संयुक्तीक होईल.

तरी डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांचे उपरोक्त दि.१६/८/२०१३ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने व जा.क्र.कै.बाळासाहेब दवाखाना ५६७दि.१७/९/२०१३च्या अहवालाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात रक्त संक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी या पदाचे दरमहा मानधन निश्चिती बाबतचा प्रस्ताव हा निर्णयाकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरी मिळणेसाठी मा.मुख्य लेखा परिक्षक व मा. मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवुन आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.प./ मु.ले.अ. यांचा अभिप्राय घेणे

यावर मु.ले.प. यांचा अभिप्राय की, **"अ"** ची **"ब"** शी तुलना करता मानधन रू.२७५००/- देणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मान्यतेस सादर करावा असे मत आहे.

यावर मु.ले.अ. यांचा अभिप्राय की, **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, मुख्य लेखा परिक्षक यांचे अभिप्रायानुसार मानधन वाढीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात रक्त संक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्ती दरमहा मानधन वाढविणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- एवढी मोठी संस्था आपल्यापेक्षा प्रायव्हेट वाल्याची सेवा चांगली आहे त्यांना आपण किती मानधन देतो.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- आपण त्यांना रू.२००००/- मानधन देतो. त्यांनी रू.२५०००/- ची मागणी केली आहे. सध्या रक्तपेढी मध्ये दुसरे डॉक्टर नाही आहे . आपण बजेटमध्ये रक्तपेढीसाठी ज्या सुधारणा करण्यासाठी तरतूद केली आहे. त्याचा त्यांना अनुभव आहे.

मा.सभापती साहेब :- यांचे काम महत्वाचे असते.

आरोग्याधिकारी डॉ. राजूरकर :- रक्त घटक वेगळे करून पुरवठयाची सेवा सुरू करायची त्यादृष्टीने ही पदे आवश्यक आहेत.

मा.सभापती साहेब :- त्याला किती रू.२५०००/- दिले का ?

आरोग्याधिकारी डॉ.राजूरकर :- डॉ.कुलकर्णी आहेत त्यांना रू.२५०००/- देतो त्यांना रू.३००००/- देणे करीता रिपोर्ट ठेवला आहे.त्यांना १०वर्षाचा अनुभव आहे.रक्त घटक सेवा सुरू केल्यावर त्यांचा उपयोग होईल.

मा.श्री. दिप चव्हाण :- आता आपल्याकडे कोणत्या सुविधा आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ब्लडच कलेक्शन करा.पहिले जोशी डॉक्टर होते ते फिरायचे ते सांगाचे ब्लड डोनेट करा.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- ते शनीशींगणापूर व कॉलेज वगैरे जाउन ब्लड डोनेट करण्यासाठी सांगतात.

मा.श्री.दिप चव्हाण :- आपल्याकडे कोणती मशिनरी आहे.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- फक्त रक्त स्टोअर करण्यासाठी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- आमचे म्हणणे आहे, त्यांनी जास्तीत जास्त ठिकाणी जाउन रक्त गोळा करावे.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- त्या दर मंगळवारी विविध ठिकाणी जाउन संकलनाचे प्रयत्न करतात.

मा.श्री. दिप चव्हाण :- त्यांना वाढवून देण्यास हकरत नाही पण त्यांनी काम जास्त करावे शहरामध्ये आतापर्यत किती कॅम्प आले.

आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :- कॅम्प चालू असतात माहिती घेवून सांगतो.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- आत पुर्ण रक्त देतो कंपोनटची सोय नाही.

मा.श्री. दिप चव्हाण :- त्यांची मागणी किती

आरोग्याधिकारी श्री. राजूरकर :- तीस टक्के पण आपण रू.५०००/- देतो.

मा.श्री.दिप चव्हाण :- मा. शासनाचे गाईड लाईन आहे का ?

आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- नाही

मा.श्री. दिप चव्हाण :- ३ डिप प्रिझर व ३ मशीनरी खरेदी करायची आहे. हे एम.बी.बी.एस. आहे त्यांना अनुभव आहे रू.२५ हजार ऑलरेडी आहे. रू.२७ हजार करा. रू. २ हजार वाढवून दया.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- रक्तपेढी विभागाच्या आवश्यक सेवेकरीता आहे. मानधन रू. २०००/- वाढवा रू. २७,०००/- करा.कंत्राटी शब्द काढून फक्त मानधन असा उल्लेख करा.

मा.श्री. शेख फैय्याज :- मानधन रू. २७०००/- करा.

मा.सभापती साहेब :- मानधन रू. २७०००/- करा. व सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. तसेच या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद रक्त संक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची पदावर करारबध्द नियुक्ती बाबतचे दरमहा मानधन वाढविणेबाबत निर्णयाकरीता च्या ऑफिस रिपोर्ट वर पुढील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

ऑफीस रिपोर्ट नुसार नमुद केलेल्या डॉ.सौ.रूपाली कुलकर्णी यांचे दिनांक १६/८/२०१३ रोजीचा अर्जानुसार व रक्त संक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांना पदावर करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात अटी व शर्ती नुसार त्यांना दरमहा मानधन वाढवून रू.२७,०००/- (रू.सत्तावीस हजार फक्त) करण्यात यावे. खर्च मंजूर.

तसेच या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.शेख फैय्याज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- २२ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- २२ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय:-**अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेस व दरमहा मानधन वाढीबाबत निर्णयाकरीता मिळणे ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना विभाग

संदर्भ :- इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र.इलेक्ट्रीक विभाग ४७९ दि.०५/०२/२०१४

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग ४७९ दिनांक ०५/०२/२०१४ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "अहमदनगर महानगरपालिका विद्युत विभागाकरीता शहरातील पथदिवे, दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करीता दि.१०/७/२०१३ ते १०/०१/२०१४ या कालावधीतील ६ महिने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सहा वायरमन या पदावर रूजू झालेले पैकी १) श्री. झिरपे विशाल विक्रम , २) सय्यद शोएब जावेद हे दोन कर्मचारी कामावर झालेले नाहीत. तरी संबंधीत कामावर हजर असलेले वायरमन यांची मुदत दिनांक १०/०१/२०१४ अखेर संपत आहे. तरी शहरामध्ये वाढीव पथदिवे , मेन्टेनन्स व अपुर्ण कर्मचा-यांमुळे संबंधीत विभागावर फार ताण येत आहे. तरी खालील प्रमाणे सहा वायरमन यांना सहा महिन्याकरीता मुदतवाढ मिळणे आवश्यक आहे.

| अ.नं. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | इलेक्ट्रीक विभाग |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | इलेक्ट्रीक विभाग |
| ३ | महारपुडे कैलास भाउसाहेब | वायरमन | इलेक्ट्रीक विभाग |
| ४ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | इलेक्ट्रीक विभाग |
| ५ | देवरे गितेश आणासाहेब | वायरमन | इलेक्ट्रीक विभाग |
| ६ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | इलेक्ट्रीक विभाग |

तरी संबंधीत कर्मचारी यांना फिरत्या स्वरूपाचे काम असुन रोज दोन तीन किलोमीटर अंतरावर जावुन कामे करावी लागतात. तसेच त्यांना रात्री पथदिवे तपासणी व देखभालीची कामे करावी लागतात. त्यामुळे ते रू.६,०००/- या मानधनावर काम करण्यास असमर्थ आहेत. तरी त्यांच्या कामाच्या स्वरूपाचा विचार करता त्यांना रक्कम रू.९,०००/- इतके मानधन मिळण्यास व सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पध्दतीने मानद नेमणूक करणेबाबत" सुचित केलेले आहे.

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचे जा.क्र.इलेक्ट्रीक विभाग १००दि.२१/०६/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अ.नगर महानगरपालिकेच्या इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यादी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे दि.१०/७/२०१३ पासुन सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधितांची जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक २१०८ दि.०८/०७/२०१३ अन्वये इलेक्ट्रीक विभागामध्ये करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती.

| अ.नं. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ६०००/ | इलेक्ट्रीक विभाग |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ६०००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ३ | महारपुडे कैलास भाउसाहेब | वायरमन | ६०००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ४ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ६०००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ५ | सय्यद शोएब जावेद | वायरमन | ६०००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ६ | देवरे गितेश आणासाहेब | वायरमन | ६०००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ७ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ६०००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ८ | झिरपे विशाल विक्रम | वायरमन | ६०००/- | इलेक्ट्रीक विभाग |

सदर वरील कंत्राटी करारानुसार केलेल्या कालावधीतील करारबध्द पुर्नेनियुक्तीची मुदतही दिनांक ०९/०१/२०१४ रोजी समाप्त झालेली आहे.

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र.१०० दि.२१/०६/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून दि.१०/०७/२०१३ पासुन सहा महिन्याकरीता दरमहा रू.६०००/- या मानधनावर अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक २१०८ दि.०८/०७/२०१३ अन्वये संबंधीतांची इलेक्ट्रीक विभागामध्ये केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव जा.क्र.आस्था./ वर्क.८२ दिनांक १२/०७/२०१३ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १२४ दिनांक ३१/८/२०१३ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित करून मंजुरी दिलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार ऑफिस रिपोर्टामध्ये नमुद तसेच जा.क्र.आस्था.कंत्राटी करारबध्द नेमणूक २१०८ दि.०८/०७/२०१३ अन्वये वायरमन यापदी दिनांक १०/७/२०१३ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रूपये ६०००/- या मानधनावर अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

**५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.**

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- २७ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- २७ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नुसार श्री. डहाळे सौरभ भाउसाहेब यांची सहा महिन्याकरीता केलेल्या मानधनावर पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना विभाग जा.क्र./वर्क. ७९ दि.५/५/२०१४

संदर्भ :- इलेक्ट्रीक विभाग जा.क्र. ५२५ दिनांक १२/०३/२०१४ अन्वयेचा प्रस्ताव

विनंती की, इलेक्ट्रीक विभाग जा.क्र. ५२५ दिनांक १२/०३/२०१४ अन्वयेचा प्रस्ताव सादर करून आस्था. जा.क्र.९४२८ दि.२१/०१/२०१३ अन्वये विद्युत विभागाकरीता (सावेडी शहर, फकिरवाडा, नागापुर , बोल्हेगांव, केडगाव) पथदिवे दैनंदिन मेन्टनंस करीता अपुरे कर्मचारी संख्येमुळे तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर ६ महिने करीता १ वायरमन यांची नियुक्ती झालेली असुन दि.२५/०९/२०१३ रोजी १ वायरमन कामावर हजर असुन अद्याप कार्यरत आहे. तरी सदरचे वायरमन कर्मचारी हे व्यवस्थित कामे पार पाडत असुन मा.नगरसेवक व नागरिकांचे तक्रारीचे वेळीच निवारण होण्यास मदत होत आहे. त्यामुळे मा.नगरसेवक व नागरिकांच्या तक्रारीचे स्वरूप कमी झालेले आहे. तरी संबंधीत वायरमन यांची दि.२४/३/२०१४ रोजी ६ महिन्याचा कालावधी पुर्ण होत आहे. सध्याचे पावसाळयाचे दिवस येत असल्याने नेहमीच्या कामाच्या व्यवस्थीत आपत्कालीन दुर्घटनेस कर्मचारी वर्गाची अत्यंत आवश्यकता असुन कामात अखंडपण राहणे आवश्यक आहे. तरी संबंधीत वायरमन यांची पुढील कालावधी करीता ६ महिने काळ तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर मुदतवाढ देण्यास असे नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग २१८ दिनांक ४/९/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी श्री.डहाळे सौरभ भाउसाहेब यांची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ४३३५ दिनांक २५/९/२०१३ अन्वये तांत्रिक खंड देवून दिनांक २५/९/२०१३ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रू.६०००/- या मानधनावर इलेक्ट्रीक विभागामध्ये करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

वरील कंत्राटी करारबध्द मानधनावरील कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत ही दिनांक २४/३/२०१४ रोजी समाप्त झालेली आहे.

इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदी अटी व शर्ती प्रमाणे श्री.डहाळे सौरभ भाउसाहेब यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ४३३५ दि.२५/९/२०१३ अन्वये तांत्रिक खंड देवुन दि.२५/९/२०१३ पासून सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे जा.क्र.आस्था./वर्क.१२५ दिनांक २५/९/२०१३ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.१४० दि.२३/१०/२०१३ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित करून सदर केलेल्या कंत्राटी करारबध्द कालावधीतील पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

यापुर्वी फिरता दवाखान्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी कंत्राटी करारानुसार सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्छे २ मध्ये खालीलप्रमाणे ठरावामध्ये नमुद केलेले आहे.

तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातून फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन, नर्सेस इ.चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुर्ननेमणूक एक दिवस तांत्रिक खंड देवून त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत यावेत असे नमूद केलेले आहे.

वरील संदर्भिय इलेक्ट्रीक विभाग ५२५ दिनांक १२/०३/२०१४ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील इलेक्ट्रीक विभाग हा देखील नागरिकांच्या दृष्टीकोनातुन अत्यंत तातडीने अत्यावश्यक सेवा असल्याने त्याअनुषंगाने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेकरीता श्री. डहाळे सौरभ भाउसाहेब यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७७८ दि.२५/४/२०१४ अन्वये दिनांक२५/४/२०१४ पासून सहा महिन्याकरिता रू.६०००/- (अक्षरी रूपये सहा हजार) या दरमहा मानधनावर इलेक्ट्रीक विभागामध्ये केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहा. आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- इलेक्ट्रीक विभाग कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- १ का ? बाजूला राहिला.

आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- तो उशीरा हजर झाला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- विषय स्थगीत ठेवा. आमच्या वॉर्डातला वायरमन सेवनिवृत्त झाले श्री. सावळे कुठे गेला.

आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- रजेवर आहे.

मा.सभापती साहेब :- वायरमन मिळणार नाही. स्थगीत करू नको. त्या विभागाचा प्रमुखांचे काम नाही का हजर रहाण्याचे. निलंबनाची कार्यवाही करा.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- कंत्राटी ८ व कायम ६ असे वायमन आहेत. रोटेशने काम केले जाते.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- १३ नगरसेवकामध्ये १ वायरमन मागीतला आहे.

मा.श्री.शेख फैयाज :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्टानुसार विषय क्र. २३ ते ३१ चा मंजूर करावा.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्टानुसार विषय क्र.२३ ते ३१ मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २३ ते ३१ चा ऑफिस रिपोर्टानुसार कार्योत्तर मंजूरीसाठी असल्याने सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती नुसार श्री. डहाळे सौरभ भाउसाहेब यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७७८ दि.२५/४/२०१४ अन्वये दिनांक२५/४/२०१४ पासून सहा महिन्याकरिता दरमहा रू.६०००/- (अक्षरी रूपये सहा हजार) या मानधनावर केलेल्या कराराबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.शेख फैयाज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- २८ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- २८ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नुसार डॉ.गणेश बी.माने यांची सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

प्रस्तावाचा मजकुर :- अ.नगर मनपा आस्थापना विभाग जा.क्र.वर्क .७८ दि.५/५/२०१४

संदर्भ - रक्तपेढी विभाग जा.क्र.२१८ दि.४/३/२०१४ अन्वयेचा प्रस्ताव

विनंती की, रक्तपेढी विभाग जा.क्र.२१८ दि.४/३/२०१४ अन्वयेचा प्रस्ताव सादर करून त्यामध्ये रक्तपेढी विभागामध्ये डॉ. गणेश माने हे कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात रक्तपेढी विभगा ामध्ये मानधनावर काम करत असुन त्यांच्या नेमणूकीचा कालावधी ३१/१०/२०१३ ते २८/४/२०१४ अखेर आहे. तरी रक्तपेढी विभागासाठी सदर कर्मचा-यांची पुढील सहा महिन्याकरीता नेमणूक करण्यात यावी. असे सुचित केलेले आहे.

सदर वरील प्रस्तावावर मा.प्र. वैद्यकीय आरोग्याधिकारी यांनी प्रस्तावीत "अ" प्रमाणे डॉ. माने गणेश वै.अ. रक्तपेढी यांना पुर्ननियुक्ती देणेस व पुढील कार्यवाहीस्तव असे सुचित केलेले आहे.

मा.प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा. दे. दवाखाना यांचे कडील जा.क्र.१०९ दि.१६/९/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागअत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावंर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती साठी थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार उमेदवारांच्या दि.११/१०/२०१३ रोजी मुलाखती आयोजित करण्यात येत असल्याबाबत दिनांक ५/१०/२०१३ रोजीच्या दैनिक केसरी व दि.६/१०/२०१३ रोजीच्या दैनिक नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देण्यात आलेली होती.

सदर प्रसिध्दी जाहिरातीच्या अनुषंगाने दिनांक ११/१०/२०१३ रोजी मा. आयुक्त तथा अध्यक्ष, निवड समिती, अहमदनगर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली मा. निवड समिती यांनी थेट पध्दतीने उपस्थित असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेवून पात्र ठरवून संबंधितांची निवड केलेली होती.

त्यानुसार जा.क्र. आस्थापना कंत्राटी नेमणूक ५३१४ दि.२८/१०/२०१३ अन्वये १) डॉ.प्रतिभा आर.भोसले २)डॉ.गणेश बी.माने यांची कंत्राटी करारानुसार रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता रू.२०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबत आदेश निर्गमित करण्यात आलेला होता. त्यानुसार अनु.१]डॉ.प्रतिभा आर.भोसले हे सदर आदेशान्वये रक्तपेढी विभागामध्ये रूजू झालेले नाहीत.

तसेच डॉ. गणेश बी.माने हे सदर आदेशान्वये रूजू झालेले असुन त्यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ५३१४ दि.२८/१०/२०१३ अन्वये अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या सहा महिन्याच्या मानधनावरील करारबध्द कालावधतीतील नियुक्तीची मुदत ही दि.२७/४/२०१४ रोजी समाप्त होणार आहे.

संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.गणेश बी.माने यांची अटी व शर्ती प्रमाणे सद्यस्थितीमध्ये तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती कामी दरमहा रूपये २०,०००/- इतका व त्यानुसार सहा महिन्याचा एकूण अंदाजे खर्च रू.१,२०,०००/- इतका अपेक्षित खर्च होईल.

यापुर्वी फिरता दवाखान्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी कंत्राटी करारानुसार दरमहा करारबध्द पुर्ननियुक्ती मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्दे २ मध्ये खालीलप्रमाणे ठरावामध्ये नमुद केलेले आहे.

तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातून फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन, नर्सेस इ. चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुर्नेनेमणूक एक दिवस तांत्रिक खंड देवून त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यांत यावेत. असे नमुद केलेले आहे.

रक्तपेढी विभाग यांचे संदर्भिय जा.क्र. २१८ दिनांक ४/३/२०१४ च्या अहवालाच्या अनुषंगाने व मा.स्थायी समिती ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१० अन्वये पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने डॉ. गणेश बी.माने यांची रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवुन जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८१दिनांक २५/४/२०१४ अन्वये दि.३०/४/२०१४ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापनाप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.गणेश बी.माने यांची पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळण प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटेः-कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्टानुसार विषय क्र.२३ते ३१ चा मंजूर करावा.

मा.श्री.शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्टानुसार विषय क्र.२३ ते ३१ मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २३ ते ३१ चा ऑफिस रिपोर्टानुसार कार्योत्तर मंजूरीसाठी असल्याने सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील सहा महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव सहा महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.गणेश बी.माने यांची अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८१दिनांक२५/४/२०१४अन्वये दि.३०/४/२०१४ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील सहा महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव सहा महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- २९ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- २९ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी डॉ. सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा जा.क्र.वर्क.७७ दि.५/५/२०१४

संदर्भ- मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह जा.क्र.१००१ दि.७/३/२०१४ अन्वयेचा प्रस्ताव

विनंती की, मा.प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह जा.क्र.१००१ दि.७/३/२०१४ अन्वयेचा प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "जा.क्र.आस्थापना कंत्राटी नेमणूक ४५०७ दि.४/१०/२०१३ अन्वये रक्त संक्रमण अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिने सहा महिन्याकरीता नेमणूक करण्यांत आलेली होती. सदरच्या नेमणूकीचा कालावधी दि.७/११/२०१३ ते ६/५/२०१४ असा असून सदरचा कालावधी दि.६/५/२०१४ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालवधीसाठी पुनर्नेमणूक करणेबाबत दि.५/३/२०१४ रोजी विंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देवून दि.८/५/२०१४ ते दि.७/११/२०१४ अखेर सहा महिन्याकरीता रक्त संक्रमण अधिकारी रक्तपेढी विभाग या पदावर पुनर्नेमणूक करणेस शिफारस आहे. संबधितास आदेशार्थ सविनय सादर असे सुचित केलेले आहे.

सदर वरील प्रस्तावावर मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी प्रस्तावीत 'अ' प्रमाणे डॉ. सौ. रूपाली कुलकर्णी रक्त संक्रमण अधिकारी यांचे काम समाधानकारक असुन अत्यावश्यक सेवेशी संबंधीत असल्याने नियमानुसार पुर्ननियुक्ती देणेस पुढील कार्यवाहीस्तव असे सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ५३० दि.४/९/२०१३ अन्वये अहवाल सादर करून त्यामध्ये अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदी जा.क्र.आस्था. कंत्राटी करारबध्द नेमणूक ८४२ दि.१४/५/२०१३ अन्वये डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची रक्त संक्रमण अधिकारी रक्तपेढी विभाग या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याकरीता नेमणूक करण्यात आलेली होती. सदरच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक ५/५/२०१३ ते ४/११/२०१३ असा सदरचा कालावधी दिनांक ४/११/२०१३ रोजी संपत आहे.सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुनर्नेमणूक करणे बाबत दिनांक २३/८/२०१३रोजी विनंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देवून ७/११/२०१३ ते ६/५/२०१४ अखेर सहा महिन्याकरिता रक्त संक्रमण अधिकारी रक्तपेढी विभाग या पदावर पुर्नेनेमूणक करणेस शिफारस आहे. संबंधितास आदेशार्थ सविनय सादर असे नमुद करून सुचित केलेले आहे.

त्यानुसार सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि.७/९/२०१३ रोजी प्रस्ताव सादर करून मान्यतेनुसार जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द ४५०७ दि.४/१०/२०१३ अन्वये रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची अटी व शर्तीप्रमाणे तांत्रिक खंड देवून दिनांक ७/११/२०१३ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रूपये २५०००/- या मानधनावर रक्तपेढी विभागामध्ये करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यांत आलेली आहे. डॉ.सौ.रूपाली आनंद कुलकर्णी यांची सदर वरील केलेल्या दरमहा मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र.आस्था./वर्कशीट १३४ दि.१७/१०/२०१३ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने स्थायी समिती ठराव क्र.१४१ दि.२३/१०/२०१३ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

"ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी या पदी डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची अटी व शर्ती नुसार जा.क्र. आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ४५०७ दि.४/१०/२०१३ अन्वये दि.७/११/२०१३पासून सहा महिन्याकरीता दरमहा रूपये २५,०००/-(रूपये पंचवीस हजार फक्त) मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर, नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी."

डॉ.सौ.रूपाली आनंद कुलकर्णी यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ८४२ दि.१४/५/२०१३ अन्वये अटी व शर्तीप्रमाणे केलेल्या मानधनावरील करारबध्द कालावधीतील नियुक्तीची मुदत ही दिनांक ६/५/२०१४ रोजी समाप्त हेत आहे.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने डॉ.सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून दिनांक ८/५/२०१४ पासून सहा महिन्याच्या कालावधी करीता रू.२५०००/- या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती कामी सहा महिन्याचा एकुण खर्च रू.१,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल. यापुर्वी फिरता दवाखान्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी कंत्राटी करारानुसार दरमहा करारबध्द नियुक्ती मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समितीने ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवुन त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे ठरावामध्ये नमुद केलेले आहे.

तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातून फिरता दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन, नर्सेस इ. चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुर्नेनेमणूक एक दिवस तांत्रिक खंड देवून त्यांना नेमणूका देण्यांत याव्यात व प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मा.स्थायी समिती कडे पाठविण्यांत यावेत. असे नमुद केलेले आहे.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा. यांचे कडील कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह जा.क्र.१००१ दि.७/३/२०१४ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभागाकरीता डॉ.सौ.रूपाली आनंद कुलकर्णी यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी तांत्रिक खंड देवून जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८२ दिनांक २५/४/२०१४ अन्वये दि.८/५/२०१४ पासून सहा महिन्याच्या कालावधी करीता रू.२५०००/-(अक्षरी रू.पंचवीस हजार फक्त) या दरमहा मानधनावर केलेल्या पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समिती ठराव क्र.१३ दिनांक ३०/४/२०१० च्या पारित

झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने कार्योत्तर मंजूरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापनाप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी डॉ. सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बारेकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. शेख फैयाज :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्टानुसार विषय क्र. २३ ते ३१ चा मंजूर करावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्टानुसार विषय क्र.२३ ते ३१ मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २३ ते ३१ चा ऑफिस रिपोर्टानुसार कार्योत्तर मंजूरीसाठी असल्याने सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील सहा महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव सहा महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी तथा रक्त संक्रमण अधिकारी यापदी डॉ. सौ. रूपाली आनंद कुलकर्णी यांची अटी व शर्ती नुसार जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८२ दिनांक २५/४/२०१४ अन्वये दि.८/५/२०१४ पासून सहा महिन्याच्या कालावधी करीता रू.२५०००/-(अक्षरी रू.पंचवीस हजार फक्त) या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील सहा महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव सहा महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ३० मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ३० मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर सहा महिन्याकरीता केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना विभाग जा.क्र./वर्क .७६ दिनांक ५/५/२०१४

संदर्भ :- रक्तपेढी विभाग जा.क्र.२२५ दि.०७/०३/२०१४ अन्वयेचा प्रस्ताव

विनंती की, रक्तपेढी विभाग जा.क्र. २२५ दि.७/३/२०१४ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये जा.क्र.आस्थापना कंत्राटी नेमूणक ४५०९ दि.४/१०/२०१३ अन्वये रक्तपेढी लॅब टेक्नीशियन या पदावर कंत्राटी पध्दतीने सहा महिनयाकरीता नेमणूक करण्यात आलेली होती.सदरच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक २२/११/२०१३ ते २१/५/२०१४ असा असून सदरचा कालावधी दिनांक २१/५/२०१४ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे त्यांनी पुढील कालावधीसाठी पुनर्नेमणूक करणेबाबत दिनांक ०५/०३/२०१४ रोजी विनंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.२३/०५/२०१४ ते २१/११/२०१४ अखेर सहामहिन्याकरीता लॅब टेक्निशियन रक्तपेढी विभाग या पदावर पुनर्नेमणूक करणेस शिफारस आहे असे नमुद करून सुचित केलेले आहे.

सदर वरील प्रस्तावावर मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी प्रस्तावीत "अ" प्रमाणे सौ. मोरे पल्लवी लॅब टेक्निशियन यांचे काम समाधानकारक असुन अत्यावश्यक सेवेशी निगडीत असल्याने नियमानुसार पुर्ननियुक्ती देणेस कार्यवाहीस्तव असे नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये रक्त पेढी विभाग जा.क्र.१०५ दि.०३/०९/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी कंत्राटी करारानुसार मोरे पल्लवी दगडू यांची जा.क्र.आस्थापना /कंत्राटी करारबध्द नेमणूक ४५०९ दिनांक दि.०४/१०/२०१३ अन्वये दिनांक २२/११/२०१३ पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती नुसार रू.१३,०००/- या दरमहा मानधनावर रक्तपेढी विभागामध्ये करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.सदरच्या कालावधीतील केलेल्या अटी व शर्तीनुसार मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत ही दिनांक २१/०५/२०१४ रोजी समाप्त होत आहे.

वरील कंत्राटी करारबध्द मानधनावरील कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र.आस्था./वर्क. १३५ दिनांक १७/१०/२०१३ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीने स्थायी समिती ठराव क्रमांक १४२ दि.२३/१०/२०१३ अन्वये ठराव पारित करून त्यास कार्योत्तर मंजूरी दिलेली आहे.

यापुर्वी फिरत्या दवाखान्याकरीता तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करारानुसार दरमहा मानधनावरचा प्रस्ताव निर्णयासाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्र.१३ दि.३०/४/२०१० अन्वये ठराव पारित होवून त्यामध्ये परिच्छेद २ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातून फिरत्या दवाखाना तसेच आरोग्याच्या सर्व सेवा अत्यावश्यक असल्याने यापुढे वैद्यकीय अधिकारी , लॅब टेक्निशियन, नर्सेस इ.चे काम समाधानकारक असल्यास त्यांचे पुनर्नेमणूक १ दिवस तांत्रिक खंड देवून त्यांना नेमणूका देण्यात याव्यात व प्रस्ताव अंतीम मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत यावेत. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

वरील संदर्भिय रक्तपेढी विभाग जा.क्र.२२५ दि.०७/०३/२०१४ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता मोरे पल्लवी दगडू यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्तीनुसार तात्पुत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन या पदी तांत्रिक खंड देवून जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८३ दि.२५/४/२०१४ अन्वये दिनांक २३/०५/२०१४ पासून सहा महिन्याकरीता रू.१३००३/- (अक्षरी रूपये तेरा हजार ) या दरमहा मानधनावर रक्तपेढी विभागामध्ये केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस मा.स्थायी समिती ठराव क्र.१३ दिनांक ३०/४/२०१० च्या पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने कार्योत्तर मंजुरी मिळाणे करीता सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढेसादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बारेकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे:-कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्टानुसार विषय क्र.२३ ते ३१चा मंजूर करावा.

मा.श्री. शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्टानुसार विषय क्र.२३ ते ३१ मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २३ ते ३१ चा ऑफिस रिपोर्टानुसार कार्योत्तर मंजूरीसाठी असल्याने सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८३ दि.२५/४/२०१४ अन्वये दिनांक २३/०५/२०१४ पासून सहा महिन्याकरीता रू.१३०००/- (अक्षरी रूपये तेरा हजार ) या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर संबंधीतांना तांत्रीक खंड देउन पुढील तीन महिन्यांकरीता मानधनावर नियुक्ती द्यावी. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. यावाढीव तीन महिन्यांच्या कालावधीत पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ३१ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ३१ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदांवर अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरिता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अ.नगर मनपा आस्थापना विभाग जा.क्र.वर्क.१०२ दि.२६/६/२०१४

संदर्भ :- सिव्हील इंजिनियर, बांधकाम विभगा यांचेकडील जा.क्र.सार्व. बांधकाम विभाग १७४ दि.६/५/२०१४ अन्वयेचा प्रस्ताव

विनंती की, सिव्हील इंजिनियर, बांधकाम विभाग यांनी त्यांचे कडील जा.क्र. सार्व. बांधकाम विभाग १७४ दि.६/५/२०१४ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये खाली नमुद केलेल्या अभियंत्याची कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सार्व. बांधकाम विभागाकडेस कनिष्ठ अभियंता या पदावर सहा महिन्याकरिता नेमणूक केली आहे.

| अ.नं. | अभियंत्याचे नांव | मुदत पर्यत |
|---|---|---|
| १ | श्री. निलेश भानुदास बारस्कर | ५/६/२०१४ |
| २ | सौ. स्नेहल राजेंद्र मुळे | ५/६/२०१४ |
| ३ | कु. स्नेहल नरेंद्र देशमुख | ५/६/२०१४ |

वरील तक्त्यातील अभियंत्याची नेमणूक रकाना नं.३ मध्ये दर्शविलेल्या तारखेस संपत आहे. सध्या बांधकाम विभागामध्ये श्री. एस.आर.निंबाळकर, श्री. एम.एस. पारखे असे एकुण २ अभियंते आहेत. कंत्राटी पध्दतीने घेतलेल्या अभियंत्यामुळे दैनंदिन कामे थोडयाफार प्रमाणात सुरळीत होत आहे. सध्या बांधकाम विभागामार्फत नगरोत्थान योजना, बी.आर.जी.एफ. नागरी दलित वस्ती सुधारणा व महानगरपालिका फंडातील कामे चालू आहेत. त्यामुळे कामे सुरळीत होण्याकरीता वरील अभियंत्याची आवश्यकता आहे या अभियंत्याची सहा महिन्यांची मुदत वरील तारखेस संपत आहे त्यांना पुढील सहा महिन्यांचे कालावधीसाठी नेमणूक देणेबाबत आस्थापनाकडून प्रस्ताव ठेवणे बाबत आदेश होणेस नमुद करून सुचित केलेले आहे.

मा.प्र.शहर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र.सार्व. बांधकाम विभाग ६४२ दिनांक ८/८/२०१३ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी १. स्नेहल राजेंद्र मुळे, २. स्नेहल नरेंद्र देशमुख यांची तांत्रिक खंड देउन अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था.कंत्राटी करारबध्द नेमणूक ४५१३ दि.४/१०/२०१३ अन्वये दि.६/१२/२०१३ पासून सहा महिन्याकरिता रू.२०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

तद्नंतर सदरच्या वरील कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरिता सदरचा प्रस्ताव हा जा.क्र.आस्था./वर्क. १३८ दि.१७/१०/२०१३ अन्वये मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.१४५दि.२३/१०/२०१३अन्वये ठराव पारित करून संबंधिताच्या सदरच्या वरील कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली होती.

१. स्नेहल राजेंद्र मुळे, २. स्नेहल नरेंद्र देशमुख यांची सदरची वरील केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती कालावधीतील नियुक्तीची मुदत ही दि.५/६/२०१४ रोजी समाप्त होणार नाही.

तसेच मा.प्र.शहर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र. सार्व. बांधकाम विभाग १०३३ दि.८/१०/२०१३ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी निलेश भानुदास बारस्कर यांची तांत्रिक खंड देउन अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र. आस्था.कंत्राटी करारबध्द नेमणूक ५२९९ दि.२५/१०/२०१३ अन्वये दि.६/१२/२०१३ पासून सहा महिन्याकरिता रूपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

तदृनंतर सदरच्या वरील कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरच्या प्रस्ताव हा जा.क्र.आस्था./वर्क . १४७ दि.२८/१०/२०१३ अन्वये मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरिता पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.१५६ दि.०१/११/२०१३ अन्वये ठराव पारित करून संबंधिताच्या सदरच्या वरील कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली होती.

निलेश भानुदास बारस्कर यांची सदरची वरील केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती कालावधीतील नियुक्तीची मुदत ही दि.५/६/२०१४ रोजी समाप्त होणार होती.

यापुर्वी मा.प्र.शहर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र.सार्व. बांधकाम विभाग १७३२ दि.२८/१/२०१३ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी श्री. अभिजीत आदिनाथ जोशी यांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा जा.क्र.आस्था./वर्क . २६० निांक १६/२/२०१३ अनवये मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.४ दि.८/४/२०१३ अन्वयेच्या ठरावामध्ये परिच्छे ३ मध्ये खालील प्रमाणे नमुद करून ठराव पारित केलेला आहे.

तसेच शहर अभियंता यांचे मागणीनुसार नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातुन प्रशासनास येणा-या कामकाजातील अडचणी विचारणा घेता बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार मानधनावरील नेमणूक करण्यात आलेल्या अभियंत्यांना, वैद्यकीय अधिकारी, लॅब टेक्नीशियन यंना तांत्रिक खंड देवून पुर्ननेमणूक करणेबाबत पुर्वी झालेल्या मा.स्थायी समितीचा ठरावाप्रमाणेच त्यांचे काम समाधानकारक असल्यास तांत्रिक खंड देवून पुर्ननेमणूक देण्यांत यावी व प्रस्ताव अंतिम मंजुरीस मा.स्थायी समितीकडे सादर करण्यात यावा.

सिव्हील इंजि. बांधकाम विभाग यांचे संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने खालील तक्त्यात दर्शविलेल्यांची बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी त्यांची नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरिता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननेमणूक कामी सहा महिन्याचा एकुण खर्च ३,६०,०००/- (रू. तीन लाख साठ हजार) इतका खर्च अपेक्षित आहे.

सिव्हील इंजि., बांधकाम विभाग यांचे संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व मा.स्थायी समिती ठराव क्र.४ दि.८/४/२०१३ अन्वये पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने खालील तक्त्या दर्शविलेल्याची बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी त्यांची नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०७/६/२०१४ पासून सहा महिन्याकरीता जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द १८२६ इ.५/६/२०१४ अन्वये दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननेमणूकी बाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रूपये | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | निलेश भानुदास बारस्कर | कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) | २०,०००/- | बांध. विभाग |
| २ | स्नेहल राजेंद्र मुळे | कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) | २०,०००/- | बांध. विभाग |
| ३ | स्नेहल नरेंद्र देशमुख | कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) | २०,०००/- | बांध. विभाग |

तरी सिव्हील इंजि. बांधकाम विभाग याचे संदर्भिय जा.क्र. सार्व. बांधकाम विभाग १७४ दिनांक ६/५/२०१४ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने व मा.स्थायी समिती ठराव क्र.४ दिनांक ८/४/२०१३ अन्वये पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने अहमदगनर महानगरपालिकेमधील बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरिता वरील तक्त्यात दर्शविलेल्यांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवून जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १८२६ दि.५/६/२०१४ अन्वये दि.७/६/२०१४ पासून सहा महिन्याकरिता दरमहा मानधनावर बांधकाम विभागामध्ये केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदांवर पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बारेकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- यात नाव का नाही लिहित.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- ३ कनिष्ठ अभियंता आहे. १ महिला व २ पुरूष

मा.दिप चव्हाण :- कंत्राट , पध्दत झाली पण कायम स्वरूपाची जागा भरा.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- बरेचसे पद हे ओपन साठीचे आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- २००७ मध्ये बिंदूनायावली तपासयाला हवी होती. अनुशेष संदर्भात पण चौकशी करा. हे जे नियमाप्रमाणे आहे ते तपासुन घ्या. १० वर्ष झाले आपण अनुशेष तपासले नाही. हे काम अपडुडेट पाहिजे ना.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- २ महिन्याच्या आत रजिष्टर अपटूडेट कराव असा आदेश दिला.

मा.श्री.दिप चव्हाण :- प्रकल्पग्रस्त, सफाई कामगार, मेहतर कामगार ज्यांचे अर्ज आले त्यांचे पुर्नवसन करणेबाबत सांगितले आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटेः-कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्टानुसार विषय क्र.२३ते ३१चा मंजूर करावा.

मा.श्री.शेख फैयाज :- ऑफिस रिपोर्टानुसार विषय क्र.२३ ते ३१ मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २३ ते ३१ चा ऑफिस रिपोर्टानुसार कार्योत्तर मंजूरीसाठी असल्याने सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या कार्योत्तर मंजूरीचा कालावधी संपण्यापुर्वी पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद कनिष्ठ अभियंता (सिव्हील) १] निलेश भानुदास बारस्कर,२] स्नेहल राजेंद्र मुळे,३] स्नेहल नरेंद्र देशमुख यांची पदांवर अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १८२६ दि.५/६/२०१४ अन्वये दि.७/६/२०१४ पासून सहा महिन्याकरिता दरमहा रूपये २०,०००/- या मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

तसेच अत्यावश्यक सेवेचा विचार करून देण्यात आलेली ही कार्योत्तर मंजूरी संपल्यावर या प्रक्रिये मधील कंत्राटी हा शब्द वगळण्यात यावा. या कार्योत्तर मंजूरीचा कालावधी संपण्यापुर्वी पदोन्नतीने कर्मचारी भरण्याची प्रक्रीया सुरू करावी व ज्या पदावर कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत,त्या पदावर नव्याने जाहिरात देउन प्रक्रियेने मानधन तत्वावर भरतीबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख फैयाज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ३२ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ३२ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१४-२०१५ पारगमन शुल्क संकलन कामी अभिकर्ता नेमणूक बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा जकात विभाग जा.क्र.१५२ दि.७/०२/२०१४

विषय- सन २०१४-१५ पारगमन शुल्क संकलन कामी अभिकर्ता नेमणूक बाबत.

सविनय सादर,

विनंती पूर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेने पारगमन शुल्क वसुलीस्तव अभिकर्ता नेमण्यास दि.२५/११/२०१३ रोजी प्रसिध्दीस दिलेल्या ई- टेंडर निविदा सुचनेनुसार दि.७/०२/२०१४रोजी निविदा उघडण्याच्या दिवशी मा.उपायुक्त(सा.)यांच्या दालनामध्ये महानगरपालिकेचे मा.उपायुक्त (सा.),मुख्यलेखाअधिकारी,मुख्यलेखाअधिक्षक,जकात अधिक्षक व निविदा धारक व त्यांचे प्रतिनिधी तसेच विविध पत्रकार हे उपस्थित होते.

सदर वेळी प्रथम लिफाफा क्र.१ उघडण्यात आले. एकुण २ निविदा धारकांच्या निविदा प्राप्त झाल्या असल्याचे मा. उपायुक्त (सा.) यांनी सर्व उपस्थितांस सांगीतले, तद्नंतर प्राप्त निविदाधारकांनी सादर केलेली लिफाफा क्र.१ ची छाननी समितीमार्फत तपासणी करण्यात आली, छाननी समितीच्या तपासणीमध्ये प्राप्त २ निविदाधारक हे पात्र ठरल्याने मा.उपायुक्त (सा.) यांनी उपस्थित निविदाधारकांस उक्त माहिती वाचुन दाखवुन सदर माहितीबाबत कोणाची काही हरकत असल्यास तसे लेखी देण्यात यावे अशाबाबत सांगीतले, प्रस्तुत वेळी उपस्थित निविदाधारकांपैकी कोणत्याही निविदाधारकाने कोणती ही हरकत नसल्याचे समक्ष सांगीतले. त्यामुळे तद्नंतर प्राप्त निविदाधारकांचे देकाराची व्यावसायीक लिफाफा क्र.२ मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांच्या परवानगीने उघडण्यात आले. सदर प्राप्त निविदा मधील माहिती पुढील प्रमाणे..

| अ क्र | निविदा धारकाचे नांव | निविदा फॉर्म फी | बयाणा रक्कम | लिफाफा क्र.१ तांत्रिक | | | लिफाफा क्र.२ व्यापारी लिफाफा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **डी.डी.क्र. / दिनांक** | **डी.डी.क्र. / दिनांक** | **१ वर्षाचा जकात व टोल वसुलीचा अनुभव** | **३ वर्षाचे लेखा विवरण पत्र** | **पॅन कार्ड झेरॉक्स** | **देकार रक्कम रूपये** |
| १ | जे.के. एन्टरप्रायजेस | १७७०२९ १/११/२०१३ | १७७१११ १/११/२०१३ | आहे | आहे | आहे | २६,१३,६०,०००/- |
| २ | लोकमंगल इन्फ्रा. प्रा.लि. | ०८७८६९ १४/१२/२०१३ | ०८७९२३ २१/१२/२०१३ | आहे | आहे | आहे | २३,५०,३२,०००/- |

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील मा.उपायुक्त (सा.) यांनी सर्व उपस्थितांना वाचुन दाखविला तसेच आलेल्या सर्व निविदांमध्ये मे. जे.के. एन्टरप्रायजेस , मुंबई यांची देकार रक्कम रूपये २६,१३,६०,०००/- या देकाराची निविदा ही सर्वात जास्त देकाराची प्राप्त झालेली आहे.

येणेप्रमाणे महानगरपालिकेने पारगमन शुल्क वसुली करीता प्रसिध्दीस दिलेल्या जाहीर निविदा सुचनेचा कालावधी ३वेळेस वाढवुन राबविलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये फेरनिविदा सुचनेमध्ये प्रसिध्द केल्यानुसार सन २०१४-१५ची प्राप्त निविदा उघडण्याबाबतची प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. मे.जे.के.एन्टरप्रायजेस,मुंबई यांची देकार रक्कम रू.२६,१३,६०,०००/-या देकाराची निविदा ही महानगरपालिकेने निश्चित केलेल्या किमान देकार रक्कम रू.२४,२१,९०,०००/- पेक्षा रक्कम रू.१,९१,७०,०००/- ने जास्त रक्कमेची आलेली असल्याने सदरची निविदा मंजुर करून सदर संस्थेस कार्यारंभ आदेश देण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधि.१९४९ मधील प्रकरण ८नियम ३५ व निविदेतील अटी व शर्तीनुसार पारगमन संकलन अभिकर्ता नियुक्ती करणेबाबत मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकरीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणे उचित आहे.

तरी प्रस्तुत बाबत पुढील आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे.

यावर अं.ले.प./मु.ले.प.यांचा अभिप्राय की,जकात अधिक्षक यांच्या अहवालाप्रमाणे पुढील कार्यवाहीस्तव मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकरीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवणे योग्य घेईल.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** नुसार उच्चतम दराची निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, **"अ"** नुसार मान्य.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे सन २०१४-२०१५ पारगमन शुल्क संकलन कामी अभिकर्ता नेमणूक विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- किती निविदा आल्या.

प्र.जकात अधिक्षक श्री. सारसर :- २

मा.श्री.सचिन जाधव :- किती वेळा कॉल केली.

प्र.जकात अधिक्षक श्री. सारसर :- ३ वेळा कॉल केली.२ निविदा आल्या.

मा.श्री. सचिन जाधव :- प्रत्येक वेळेसच्या किती रकमा ते सांगा.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- निविदा प्रथम किंवा दुस-या वेळेस एकाच आली किंवा आली नाही तर आपण टेंडर ओपन करीत नाही.

प्र.जकात अधिक्षक श्री.सारसरः- दिनांक २५/११/२०१३ रोजी पहिली जाहिर निवीदा प्रसिध्द करण्यात आली.त्यावेळी फक्त एक निविदा प्राप्त झालेली आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- कोणाची निवीदा प्राप्त झालेली आहे.नांव सांगा.

श्री.दिनेश गांधी. संगणक विभाग :- निविदा प्रक्रीये मध्ये प्राप्त निविदा संख्या दिसते. नांव कळत नाही.

मा.श्री. सचिन जाधव :- नांव दिसत नाहि हे कसे शक्य आहे.

दिनेश गांधी. संगणक विभाग :- येत नाहि.

प्र.जकात अधिक्षक श्री. सारसर:- दुसरी निवीदा दिनांक ६/१२/२०१३ रोजी प्रसिध्द केली असता एकच निविदा प्राप्त झालेली आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- निविदा मधील रक्कम किती होती ?

प्र.जकात अधिक्षक श्री. सारसर:- निविदा न उघडल्याने सांगता येणार नाही. मा.शासनाच्या निर्देशानुसार मागील प्राप्त देकार रकमेमध्ये १५ टक्के वाढ करून निश्चित करण्यात आलेली रक्कम रूपये २४ कोटी २१ लाख हि किमान देकार रक्कम होती.

मा.श्री.सचिन जाधव :- हि देकार रक्कम कोणत्या तारखेस ठरविण्यात आली ते सांगा.

प्र.जकात अधिक्षक श्री. सारसर:- महानगरपालिकेने दिनांक २५-११-२०१३ रोजी निविदा प्रसिध्दी दिल्या नुसार निश्चित केलेली किमान देकार रक्कम रूपये २४ कोटी २१ लाख आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- सदरची निवीदा प्राप्त होवून सात महिन्याचा कालावधी झालेला आहे.त्याला तीन महिन्यात ठेका हस्तांतर करायला पाहिजे होता.फेरनिविदा काढल्यास आणखी जास्त निविदा प्राप्त होवू शकतात.

मा.प्र.आयुक्त श्री.बेहेरे :- अहमदनगर पालिकेची सार्व.निवडणूक झालेनंतर स्थायी समिती अस्तित्वात आल्यानंतर दुस-याच दिवशी,लोकसभा निवडणुक आदर्श आचारसंहिता तसेच यापुर्वी स्थायी समिती अस्तीत्वात नसल्याने सदरचा विषय लांबत गेला.

मा.श्री. सचिन जाधव :- आपण ७ महिने नुकसान होवूनही त्यालाच ठेका देणे चुकिचे आहे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेने निश्चित केलेली किमान देकार रक्कम हि सन २०१४-१५ करिता राहणार आहे.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- फेरनिवीदा काढायची म्हटली तरी देकार रक्कम तीच रहाणार आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- हॅण्डओव्हर करण्याचा काय नियम आहे.नसल्यास तसे लेख्ी कळविण्यात यावे.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- माहिती घेवून सांगतो.

मा.श्री.सचिन जाधव :- मुदत संपल्यानंतर जे नुकसान झाले त्यास जबाबदार कोण ?

मा.श्री.दिप चव्हाण :- दि.३१/१२/२०१३ रोजी मुदत संपल्यानंतर जी मुदत वाढ देण्यात आली ते कोणत्या नियमाने. कोणी मुदत वाढ दिली. आयुक्तांना कोणत्या कायदयाप्रमाणे मुदतवाढ देण्याचे आधिकार आहेत.

प्र.जकात अधिक्षक श्री. सारसर:- मा.शासनाने दि.१९/४/२०११ च्या दिलेल्या निर्देशानुसार सक्षम प्रधिका-याच्या मान्यतेने मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- सक्षम प्रधिकारी कोण ? महानगरपालिकेने मुदतवाढ दिली तर त्यानुसार वर्कऑर्डर दयायला पाहिजे होती.तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण झाली होती.तर त्यांना वर्कऑर्डर दयायला हवी होती.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४ नुसार मनपा प्राधिकारी म्हणजे महासभा,स्थायी समिती व आयुक्त इत्यादी होय.

मा.श्री.दिप चव्हाण :- ज्या वेळी ठेक्याची मुदत संपलेली होती अशा वेळी महानगरपालिकेच्या कर्मचा-यांकडून पारगमन फी वसुली का करण्यात आली नाही.? निविदा प्रक्रियेत रक्कम रूपये ३ कोटी चे नुकसान झालेले आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित व्हायला पाहिजे.

मा.श्री.दिप चव्हाण :- संस्थेचे हित पहायला पाहिजे सदर नुकसानीस स्थायी समिती जबाबदार रहाणार नाही.

मा.श्री.सचिन जाधव :- नुकसानीसाठी प्रशासन जबाबदार राहिल.

मा.श्री.दिप चव्हाण :- मुदतवाढ देतांना २६ कोटी वर दयायला पाहिजे होती.सदर बाब हि गंभीर आहे.मुदत वाढी बाबत अभिकर्त्यास केव्हा पत्र देण्यात आले.

श्री.सारसर, प्र.जकात अधिक्षक :- दि.२४/१२/२०१३

मा.श्री.दिप चव्हाण :- काय पत्र पाठविले.

श्री.सारसर, प्र.जकात अधिक्षक :-पारगमन संकलन करणे बाबत.

मा.श्री.दिप चव्हाण :- करारनाम्याची मुदत संपलेली असतांना मुदत वाढीचा करारनामा का करण्यात आला नाही.महासभा अस्तित्वात आसतांना मुदतवाढीचा विषय निर्णयास्तव का ठेवण्यात आला नाही.

मा.श्री.सभापती साहेब :- ठेक्याची किमान देकार रक्कम प्रशासनाने ठरविली असल्याने त्याची जबाबदारी स्थायी समितीची नाही.

मा.सचिन जाधव :- दिनांक ७/२/२०१४ नंतर पाच महिने पुर्ण झाले आहेत.१५ टक्के वाढी नुसार ही रक्कम मिळणार होती.त्यास जबाबदार कोण ? पारगमन ठेकेदाराला मुदतवाढ कोणत्या आधारे दिली. त्याला मुदतवाढ देताना त्याची मुदत दि.३१/१२/२०१३ ला संपत होती. पण प्रशासनाने टेंडर दि.७/२/२०१४ ला ओपन केले ते रू.२६ कोटी १३ लाखाचे होते. मागच्या टेंडर पेक्षा रू.५ कोटी जास्त आले असताना वेळावेळी दि.७/२/२०१४ नंतर पुर्वीच्या म्हणजे रू.२१ कोटीच्या दरानेच त्याच ठेकेदाराच पारगमन वसुलीचे पत्र दिले. त्याने पण त्या दराने काम केले. पण यात मनपाचे ५ महिन्याचे वाढीव दराने २.५ ते ३ कोटी रू. चे नुकसान आले आहे. यामुळेच पुढचे टेंडर ५ महिने उशीरा म्हणजेच जुलै २०१५ मध्ये निघेल हे वाढीव १५% नुकसान पुढील ५ महिने होणार आहे ही रक्कम रू.४ कोटी होउ शकते. तरी आमचे म्हणणे आहे की या नुकसानीची जबाबदारी निश्चित करा. ही जबाबदारी निश्चित करताना मा. शासनाचे मार्गदर्शन घ्यावे. तसेच हया टेंडर ची वर्क ऑर्डर करताना शासनाची हे टेंडर आजपासून किती दिवस अंमलात असेल याचीही मार्गदर्शन घ्यावे व नंतर अभिकर्त्यास वर्क ऑर्डर द्यावी. त्याच प्रमाणे निविदा दि.७/२/२०१४ रोजी उघडली, त्याची वर्क ऑर्डर किती दिवसात अभिकर्त्याला देणे कायदयाप्रमाणे आवश्यक होते हे तपासून वर्कऑर्डर द्यायची की नाही द्यायची, का दुसरे टेंडर काढायचे ही कार्यवाही करा.

मा.बाळासाहेब बोराटेः- याला ठेका देतांना पूर्वी जे वाद झाले ते रक्कम ठरवून दिली ती नियमावली सांगा.ड्रायव्हर लोकांना त्रास होतो, त्यांना मारहाण झालेली आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- पारगमन वसूलीत करप्शन निदर्शनास आल्यास ठेकेदारास काय शिक्षा देता येईल.

प्र.जकात अधिक्षक श्री.सारसर :- पारगमण वसुली करीता ठेकेदारासाठीचे नियम वाचुन दाखवीले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- पारगमन नाक्यावर सी.सी.टि.व्ही. बसवावेत.

मा.श्री.सचिन जाधव :- आम्हाला काही सुचना करावयाच्या आहेत.

मा.सभापती साहेब :-तुम्ही लेखी सुचना दया. पारगमन ठेक्याकरीता प्राप्त झालेली जे.के.एन्टरप्रायजेस यांची रक्कम रूपये २६ कोटी १३ लाख ६०हजार रूपये ची निविदा १ कोटी ९१ लाख ७० हजार ने जास्त असल्यामुळे त्यास मान्यता देण्यात येत आहे. जर या बाबत कोणाचा विरोध असल्यास तसे सांगावे.

मा.श्री.सचिन जाधव :- जी शंका होती त्याबददल जे प्रश्न विचारले त्या शंकेचे निरसन झाले नाही.ही निविदा पास करतांना कायदयाच्या चौकटीत आहे किंवा नाही, निविदा मंजुरीस पाच महिने उशिर झालेला आहे.निविदा मंजुरीस आमचा विरोध नोंदविण्यात यावा.

मा.श्री.दिप चव्हाण :- तुम्ही कशाल विरोध करीता आहात.

मा.श्री.सचिन जाधव:-संपुर्ण निविदा प्रक्रियेला विरोध आहे.आणखी कोणाचा विरोध असल्यास हातवर करावा.

प्रस्तुत वेळी मा.श्री दत्तात्रेय कावरे, मा.श्री.सचिन जाधव,मा.सौ.शारदा ढवण, मा.सौ.नंदा साठे,मा.सौ.सुनिता मुदगल या सभासदांनी हात वर केला.

मा.सभापती साहेब :- बहुमताने निविदा मंजूर करण्यात येत आहे

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नियमाप्रमाणे पारगमन वसूली करण्याबाबत ठेकेदारास सुचना देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- पारगमन वसूली करीता जास्तीच्या दराची निविदा प्राप्त झालेली असल्याने जे.के.एन्टरप्रायजेस या निविदाधारकास मंजुरी देण्यात येत आहे.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर पालिकेने पारगमन ठेक्याकरीता किमान देकार रक्कम रूपये २४ कोटी २१ लाख ९० हजार निश्चित केली होती. प्राप्त झालेली जे.के.एन्टरप्रायजेस यांची रक्कम रूपये २६ कोटी १३ लाख ६०हजार रूपये ची निविदा रूपये १ कोटी ९१ लाख ७० हजार ने जास्त असल्यामुळे त्यास मान्यता देण्यात येत आहे. विरोध करणा-या सदस्यांचा विरोध नोंदवून घ्यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका हद्दीत सन २०१४-२०१५ या वर्षाकरिता पारगमन शुल्क वसुलीकरिता अभिकर्ता नियुक्ती करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पाहुन कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासून पुढील एक वर्ष कालावधीकरीता जे.के.एन्टरप्रायजेस, डोंबिवली, ठाणे यांच्या रक्कम रू.२६,१३,६०,०००/- च्या निविदेस बहुमताने मंजूरी देण्यांत येत आहे. ठरावास मा.श्री दत्तात्रेय कावरे, मा.श्री.सचिन जाधव,मा.सौ.शारदा ढवण, मा.सौ.नंदा साठे,मा.सौ.सुनिता मुदगल या सभासदांनी विरोध नोंदवला आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही त्वरीत करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा. श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव बहुमताने मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ३३ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ३३ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. महेंद्र रमेश छाजेड, रा. इंडस्ट्रीज इस्टेट नगर-पुणे रोड,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-४, वॉर्ड क्रमांक २४, बील क्रमांक ३७१/१ आकारणी केलेली सन २००३ ते २०१४ अखेर पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा बुरूडगाव प्रभाग समिती क्र.४

विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, वॉर्ड क्र.२४ बिल नं.३७१ मिळकत धारक श्री. महेंद्र रमेश छाजेड यांनी दि.१८/६/२०१३ रोजी अर्ज देउन कळविले आहे की नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टी आकारली येत आहे तरी प्रत्यक्ष पहाणी करून सदरची आकारणी रद्द करावी असे त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

सदर अर्जदाराचे अर्जाप्रमाणे पाणीपुरवठा विभागाचे फिटर यांनी प्रत्यक्ष जागेवर जाउन पहाणी करून सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसलेबाबत दि.१/८/२०१३ अन्वये रिपोर्ट देउन कळविणे आहे.

वसुली विभागाकडील दप्तरी पहाणी केली असता सन २००३ ते २०१४ अखेर रक्कम रू.७१,०९३/- इतकी पाणी पट्टीची आकारणी संबंधीत मिळकत धारकास करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी मनपाने अद्यापपर्यत नळ कनेक्शन दिलेले नसल्याने सन २००३ ते २०१४ अखरेची रक्कम रू.७१,०९३/- तसेच शास्तीची रक्कम रद्द करावी लागेल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार सन २००३ ते २०१४ अखेरची पाणीपट्टीची रक्कम रू.७१,०९३/- तसेच शास्ती निर्लेखित करण्यास सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे कामी आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी व कर निरीक्षक प्र.स.क्र.४ यांचा अहवाल असे.

यावर सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, सादर मु.ले.प. यांचा अभिप्राय घेणे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी व कर निरीक्षक प्र.स.क्र.४ यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, सादर वसुली लिपिक , फिटर, कर निरीक्षक , प्र.अ. तसेच मु.ले.प. यांचे अभिप्राय व अहवालानुसार संबंधितास नळ कनेक्शन नसतांना सुध्दा पाणीपट्टी आकारणी केली आहे असे स्पष्ट होते. त्यामुळे सन २००३ ते २०१४ अखेरची एकुण आकारण्यात आलेली पाणीपट्टीची रक्कम रू.७१,०९३/- तसेच त्यावर होणारी शास्तीची रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार निर्लेखित करणे गरजेचे आहे याकरिता सदरचे प्रकरण मा. स्थायी समिती समोर ठेउन त्याकामी आदेश व निर्णय होणे उचित वाटते.

सबब आपले आदेशार्थ व निर्णयास्तव तसेच सदरचे प्रकरण मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा निर्णयार्थ ठेवणे योग्य सबब आदेश होणेस विनंती.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मान्य.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. दिप चव्हाण :- दोन नंबर झोनचे कोण आहे.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- ३४ खुल्या भुखंडाचे आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- प्रभाग समिती किती आहे.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- एक आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- भुखंड कोठे आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- महानगरपालिकेच्या आहे का?

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- मनपाचे खुल्या जागा आहेत.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- किती अर्ज आहेत ते पाहिले का ? वस्तुस्थिती पाहून रिपोर्ट घ्या.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- मागच्या वेळेला छाजेड आणि निकमचे निर्लेखित प्रकरण एकाच वेळी होतो. मग निकमचे का नाही आले. छाजेडच कसे आले.

श्री. नाना गोसावी :- निकम मुळे बाकीचे प्रकरण पाठवले नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- हा विषय स्थगित करून सगळे पुढच्या वेळेला करू.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अर्जदार श्री. महेंद्र रमेश छाजेड, रा. इंडस्ट्रीज इस्टेट नगर-पुणे रोड,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-४, वॉर्ड क्रमांक २४, बील क्रमांक ३७१/१ आकारणी केलेली सन २००३ ते २०१४ अखेर पाणीपट्टी रक्कम रूपये ७१,०९३/-तसेच शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.अजिंक्य बोरकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.

## मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४

विषय क्रमांक- ३४ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ३४ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या भुखंडास आकारणी करण्यात आलेल्या प्रभाग समिती क्रमांक १,वॉर्ड क्र.५७ मालमत्ता धारकाचे बील क्रमांक २२६,२२७,२२८,२२९,४५९,५५०,६२९,६३० या भुखंडास आकारणी कराची सन १९९५ ते २०१४ अखेर रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा सावेडी वसुली विभाग दि.२०/७/२०१३

सावेडी वसुली मदतनीस वॉर्ड क्र.५७ यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील सावेडी विभागात नवलेनगर येथील व रामकृष्ण कॉलनी येथील सावेडी स.नं.८० या जागेतील रेखाकंनातील खुल्या जागेवर सन १९९५ सालापासून मुल्यांकन करताना कर आकारणी करण्यात आलेली आहे. असे एकूण आठ खुल्या जागा आहेत त्याची यादी सोबत जोडली १९९५ सालापासून सदर मिळकतीवर २०१३-२०१४ पर्यत एकुण ६,४५,८५६/- अशी रक्कम थकबाकी पोटी येणे आहे.

परंतु सदरचे रेखांकन मंजुर करताना सदर रेखाकंनातील ओपन स्पेस शुल्क जागा मालकांनी महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम १९६६ नुसार महानगरपालिकेस हस्तांतरित केले आहे. किंवा कसे या बाबत माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही सदरचे भुखंड खुले असल्यास व ते रेखाकंनामधील खुले भुखंड असल्यास त्यावर कर आकारणी करता येत नाही त्यामुळे याबाबत नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन केलेली आकारणी सिघ करून रक्कम निलेखित करावी लागेल सबब आदेशार्थ सविनय सादर.

सोबत- थकबाकी दर्शविणारा तक्ता जोडला आहे.

याप्रमाणे वसुली मदतनीस यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की,सादर सदरचे खुले भुखंड मनपाकडे वर्ग / हस्तातंरण झाले आहेत काय?याबाबत मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणे योग्य होईल तथापी आदेशार्थ सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्र.अ. खुले भुखंड वगळता इतरांना बील दयावे. खुले भूखंडाबाबत टी.पी. यांचा अभिप्राय घ्यावा मनपाकडे हस्तांतरण न अनधिकृत वापर आहे का ? असल्यास (५४%) तसे बिल देण्यात यावे फेरसादर करा.

यावर वसुली मदतनीस यांचा अभिप्राय की, फेरसादर वॉर्ड क्र.५७ बिल क्र.२२६ ते २२९ तसेच ४५९,५५०,६२९,६३० खुले भुखंड असुन सदर भुखंड हस्तांतरण केलेबाबत इकडील कार्यालयास माहिती अप्राप्त असुन समक्ष पाहाणी दि.६/८/२०१३ ला केली असता अनधिकृत वापर नाही आदेशार्थ सविनय सादर.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली मदतनीस यांचे समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी मुळ नावे वसुली अभिलेखा नोंद असुन अनधिकृत वापर नाही आदेशार्थ सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त(कर)यांचा अभिप्राय की, नगररचनाकार यांचा अभिप्राय घेउन फेरसादर करणे.

यावर वॉर्ड ऑफिसर यांचा अभिप्राय की, फेर सादर सदर अहवालामध्ये नमुद केलेली मिळकत ही खुल्या भुखंड स्वरूपाची असुन नुकतेच प्राप्त झालेल्या नगररचनाकार यांच्या कडील जा.क्र. टी.पी.८१६६ दि.२४/९/२०१३ प्राप्त पत्राबरोबर सादर केलेल्या ७/१२ उता-या करून असे दिसुन येते की मुळ मिळकतधारक यांनी स.नं. ९४, ब्लॉक अे १७६०.७५ चौ.मी., ब्लॉक सी ११३५.२५चौ.मी,ब्लॉक ९३२.३५ चौ.मी., ब्लॉक ई१०६८.७६चौ.मी. क्षेत्र असलेली मुळे रेखांकनातील खुल्या जागेस महानगरपालिकेचे नाव लावण्यात आलेले आहे. असे दिसुन येते. परंतु या पुर्वी सदर मिळकतीस शहराचे करयोग्य मुल्यांकन करताना चुकून कराची आकारणी करण्यात आलेली आहे. कारणक मालकी ही महानगरपालिकेची आहे. तरी सदर खुल्या भुखंडास आकारण्यात आलेली बील नं.२२६ते २२९ व ४५९, ४५०,६२९,६३० वरील असलेली कराची रक्कम ६४५८५६/-+ शास्तीसह रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १५२नुसार निर्लेखित करणेबाबत अहवाल सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, नगररचनांकार यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार व सोबत जोडलेल्या ७/१२ चे उतारा पाहता सदर भुखंडावर मनपाचे नाव आहे. त्यामुळे सदर भुखंडावर लावण्यांत आलेली आकारणी रक्कम रूपये ६,४५,८५६/- + शास्तीसह होणारी रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार निर्लेखित करणेकरिता सदरचा विषय विचारार्थ तथा निर्णयार्थ मा.स्थायी समिती समोर ठेवणे उचित सबब आदेशार्थ

यावर आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

वॉर्ड क्रमांक ५७ मधील ओपन स्पेनची डिमांड दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे सन १९९५ ते सन २०१३-२०१४ अखेर एकुण थकबाकी खालील प्रमाणे आहे.

| बिल क्र. | प्लॉट क्र. | मालमत्ता धारकाचे नांव | मागील बाकी | चालु बाकी | एकुण बाकी |
|---|---|---|---|---|---|
| २२६ | D३३ | सुनंदा अशोक माधवराव नवले, नवलेनगर | २६,८५६/- | २४४३/- | २९,२९९/- |
| २२७ | D३४ | सुनंदा अशोक माधवराव नवले, नवलेनगर | २६,८५६/- | २४४३/- | २९,२९९/- |
| २२८ | D३५ | सुनंदा अशोक माधवराव नवले, नवलेनगर | २६,८५६/- | २४४३/- | २९,२९९/- |
| २२९ | D३६ | सुनंदा अशोक माधवराव नवले, नवलेनगर | २६,८५६/- | २४४३/- | २९,२९९/- |
| ४५९ | H १ | शरद मुथ्या, रामकृष्ण कॉलनी | ४,२५,४५४/- | ३४३६५/- | ४,५९,८१९/- |
| ५५० | A ६४ | अशोक बन्सीलाल मुथ्या रामकृष्ण कॉलनी | १८३६८/- | १८२१/- | २०१८९/- |
| ६२९ | D ४० | शरद एम मुथ्या , रामकृष्ण कॉलनी | २२,२९९/- | २०२७/- | २४,३२६/- |
| ६३० | D ४१ | शरद एम मुथ्या , रामकृष्ण कॉलनी | २२,२९९/- | २०२७/- | २४,३२६/- |
| | | | ५,९५,८४४/- | ५०,०१२/- | ६,४५,८५६/- |

दिनांक ३१/०७/२०१३ अखेरची थकबाकी नंतर दरमहा २% शास्ती

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या भुखंडास आकारणी कराची सन १९९५ ते २०१४ अखेर रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- हा खुल्या भुखंडाचा कर आकारणीचा विषय आहे. हा प्रभाग समिती क्रमांक १ चा विषय आहे.

प्रभाग अधिकारी श्री. सोनवणे :- मनपा हद्दीतील नवलेनगर व रामकृष्ण सोसायटी मधील ८ खुल्या जागा आहे. मनपाच्या ताब्यात असल्याने ती रक्कम निर्लेखित करणे आवश्यक आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- एवढे दिवस का लागले,हा विषय स्थगित करून सगळे पुढच्या वेळेला करू. महानगरपालिकेच्या मोकळया भुखंडांचे लागलेले कर निर्लेखीत करायचे आहेत मंजूरी द्यावी.

मा.श्री.कुमार वाकळे :- हे भुखंड महानगरपालिकेचे आहेत. त्यामुळे ऑफीस रिपोर्ट नुसार येणे दाखवलेली रक्कम निर्लेखीत करण्यास मंजूरी द्यावी.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफीस रिपोर्ट नुसार निर्लेखीत करण्यास मंजूरी द्यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या खुल्या भुखंडास आकारणी करण्यात आलेल्या प्रभाग समिती क्रमांक १,वॉर्ड क्र.५७ मालमत्ता धारकाचे बील क्रमांक २२६,२२७,२२८,२२९,४५९,५५०,६२९,६३० या भुखंडास आकारणी कराची सन १९९५ ते २०१४ अखेर रक्कम रूपये ६,४५,८५६/- अधीक शास्ती निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सूचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ३५ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ३५ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार भरत हरिभाउ भोर, रा. सावेडी हडको, अ.नगर यांना मोकळया प्लॉटवर नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-१,वॉर्ड क्रमांक ६४, बील क्रमांक ७६९ कर आकारणी केलेली सन २००७ ते २०१३ अखेर पाणी पट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा सावेडी वसुली विभाग

संदर्भ :- अर्जदार यांचा दि.१७/५/२०१२ चा अर्ज

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये विनंती अहवाल वॉर्ड क्र.६४ चे लिपिक यांजकडून देण्यात येतो की, श्री. भरत हरिभाउ भोर, रा. म्यु.पल हाडको टि.व्ही. सेंटर यांनी मकासरे हेल्थ क्लब समोर त्यांच्या मालकीचा मोकळा भुखंडास लावण्यात आलेली पाणी पट्टीची आकारणी कमी करण्याकरिता अर्ज केला आहे.

श्री. भरत हरिभाउ भोर यांचा वॉर्ड नं.६३ बिल नं.७६९ , मकासरे हेल्थ क्लब समोर मोकळा भुखंड असुन सदर भुखंडास सन २००७ पासून पाणी पट्टीची आकारणी होत आहे. अर्जदार यांच्या अर्जानुसार हेडवसुली यांच्या समक्ष जागेची स्थळ पहाणी केली असता सदर ठिकाणी मोकळा भुखंड असून नळ कनेक्शन आढळुन आले नाही.

दि.१८/६/२०१२ रोजी मनपा हेडफिटर यांना सदर ठिकाणी नळ कनेक्शन आहे किंवा कसे याबाबत अहवाल देण्याबाबत कळविण्यात आले होते. मनपा हेडफिटर यांनी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याबाबतचा अहवाल दिला आहे.

श्री. भरत हरिभाउ भोर यांचा वॉर्ड नं.६३ बिल क्र.७३९ येथे मोकळा भुखंड असून त्यास मोकळया भुखंडाची कर आकारणी आहे तेथे कोणतेही नळ कनेक्शन नसल्यामुळे त्यांना आकारण्यात आलेली सन २००७ ते २०१३ अखेरची पाणीपट्टी रक्कम रूपये ९,०००/- कमी करण्यास शिफारस आहे.

येणेप्रमाणे वसुली क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, समक्ष जागा दाखवणे

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, समक्ष जागेची पहाणी व चौकशी केली असता सदर जागा हि खुल्या भुखंड असुन त्यास यापूर्वी संगणक प्रणाली मध्ये नोंद करताना नळ कनेक्शन नोंद लावण्यात आलेली आहे ती चुकीची आहे.तरी म्यु.पल फिटर यांच्या अहवालानुसार सदर जागेस आकारण्यात आलेल्या नळाच्या कराची आकारणीची रक्कम रूपये ९०००/- हि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ नुसार निर्लेखित करणे योग्य होईल.तरी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव अहवाल सविनय सादर.

यावर सहाय्यक मु.नि.कर.सं.अधिकारी यांचा अभिप्राय की, नवीन आदेशानुसार प्रभाग अधिकारी व प्रभाग अभियंता यांचा स्पष्ट अभिप्रायासह सादर करावे.

यावर म्यु.फिटर यांचा सहमती दर्शक सही

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, आज दिनांक २०/३/२०१३ रोजी समक्ष फिटर, पाणीपुरवठा अभियंता व प्रभाग अधिकारी समवेत सदर जागेची पाहणी केली असता सदरची जागा ही मोकळी (ओपन स्पेस) असुन सदर ठिकाणी नळ कनेक्शन असल्याचे आढळुन येत नाही.

यावर मुख लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ तसेच सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, सविस्तर अभिप्रायानुसार तसेच समक्ष पहाणी केल्यानुसार मोकळया प्लॅटवर नळ कने.ची नोंद करण्यात आली असुन त्याचे बील रूपये ९०००/- दर्शविण्यात आलेली आहे. सदरची रक्कम ही चुकून लागलेली असल्यामुळे व अर्जदार यांनी याबाबत दिलेल्या अर्जानुसार रक्कम रूपये ९०००/- + शास्ती रक्कम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियातील कलम १५२ नुसार निर्लेखित करणेकामी मा.स्थायी समिती समोर सदरचा विषय विचारार्थ तथा निर्णयास्तव ठेवणे योग्य. सबब आदेशार्थ.

यावर आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- पाणी पट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. कुमार वाकळे :- मोकळया प्लॉटच्या पाणीपट्टीचा विषय मंजूर करावा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- विषय मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अर्जदार भरत हरिभाउ भोर, रा. सावेडी हडको, अ.नगर यांना मोकळया प्लॉटवर नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-१,वॉर्ड क्रमांक ६३, बील क्रमांक ७६९ कर आकारणी केलेली सन २००७ ते २०१३ अखेर पाणी पट्टी रक्कम रूपये ९०००/-(रूपये नउ हजार फक्त) व त्यावरील शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ३६ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ३६ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार प्रकाश टिकाराम बोरोल , रा.इंदिरानगर,केडगाव,अ.नगर यांना प्रभाग समिती क्रमांक-४,वॉर्ड क्रमांक ३४, बील क्रमांक ४५२ कर आकारणी केलेली सन २०१३-२०१४ अखेर घरपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा बुरूडगाव प्रभाग समिती क्र.४ दि.२७/४/२०१३

वॉर्ड क्र.३४ चे वसुली लिपिक यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, श्री. प्रकाश टिकाराम बोरोले (इन्सोटेक रिफायनरी फॅक्टरी) वॉर्ड क्र.३४ , बिल नं.४५२ यांनी दिनांक १५/०४/२०१३ रोजी अर्ज देउन कळविले की, बुरूडगांव हे पूर्वी अहमदनगर महानगरपालिकेत समाविष्ट होते परंतु सन २०११ मध्ये बुरूडगाव हे महानगरपालिकेच्या हद्दीतुन वगळण्यात आल्याने सदर मिळकतीचे घरपट्टी टॅक्सचे बिल आल्याने सदर मिळकत मिळकतही बुरूडगाव हद्दीत येत असल्याने कुठल्याही प्रकारचा घरपट्टी टॅक्स लावण्यात येउ नये व हा घरपट्टीचा टॅक्स रद्द करण्यात यावा असे त्यांनी नमुद केले आहे.

सदर अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर मिळकत ही बुरूडगांव हद्दीमध्ये असल्याचे दिसुन येत आहे. सदर मिळकत ही दि.१/७/१९९९ मध्ये बुरूडगांव केडगाव व इतर गांव महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये (हद्दवाडी) समाविष्ट करण्यात आले होते. सदर मिळकतीला महानगरपालिकेची सन २००३-०४ या आर्थिक वर्षात रिव्हीजन करण्यात आली.त्यावेळेस सदर मिळकतीला घरपट्टीची कर आकारणी करण्यात आली. सदर कर आकारणी ही बुरूडगांव हद्दवाडीमध्ये न घेता सदरची मिळकत ही वॉर्ड क्र.३४ बिल नं.४५२ , केडगाव हद्दीमध्ये घरपट्टीची कर आकारणी करण्यात आली. सदर आकारणी प्रमाणे सदर मिळकत धारकाने सन २०१२-१३ मार्च अखेर कर आकारणीचा भरणा पावती क्रमांक AS/४७५५९ दि.२९/१०/२०१२ ने रक्कम रूपये २०७१५/- चा संपूर्ण भरणा केलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिका (अहमदनगर मोठे नागरी क्षेत्राच्या) क्षेत्रातुन बुरूडगांव या महसुली गांवाचे संपूर्ण क्षेत्र वगळण्याकामी महाराष्ट्र शासनाचे क्र.० ए.०एच.सी.१००४/५२/प्र.० क्र.० १५९/०४/नवी ०२४ दि.६/१/२००९ रोजीच्या शासकीय आदेशान्वये वगळण्यात आलेले असुन सदरची मिळकत ही बुरूडगांव हद्दीमध्ये समाविष्ट असल्याने सन २०१२-१३ या आर्थिक वर्षापासुन सदरची मिळकत ही निर्लेखित (रद्द ) करावी लागेल.

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार सदरची मिळकत वॉर्ड क्र.३४, बिल नं.४५२ , श्री. प्रकाश टिकाराम बोरोले (इन्सोटेक रिफायनरी फॅक्टरी) ही सन २०१२-१३ या आर्थिक पासून सदरचा प्रस्ताव निर्लेखित (रद्द ) करण्यास मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास सदरचा प्रस्ताव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपिक, कर निरीक्षक , प्रभाग अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर सहा.मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, सादर, सदरची इमारत मौजे बुरूडगाव या गावाच्या हद्दीत आहे. सदरचे गांव दिनांक १६/६/२०११ रोजीच्या मा. शासनाने काढलेल्या अधिसुचनेनुसार अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातुन वगळलेले आहे अधिसुचनेची प्रत या प्रस्तावात आहे त्यामुळे सदरची इमारत महानगरपालिका क्षेत्रात येत नसल्याने त्या इमारतीवर कर आकारणी करणे संयुक्तीक

नाही तथापि सदरची कर आकारणी रद्द करून उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार सन २०१२-१३ व २०१३-१४ या दोन वर्षाच्या कराची रक्कम रू.१९,८७२/- इतकी वसुल होणारी नसल्याने मा.स्थायी समितीच्या मान्यते सदरची रक्कम निर्लेखित करणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी प्र.स. क्र.४ तसेच सहा.मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार मान्यतेचे

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, याप्रमाणे इतर वगळलेल्या घरांचा एकत्रित अहवाल स्वत: प्रभाग अधिकारी यांनी ठेवणे अपेक्षित आहे.तूर्त सदर प्रस्तावास मान्यता देणेस्तव व मा.स्थायी समितीपुढे निर्णयार्थ पाठविणेस्तव आदेशार्थ सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- घरपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- विषय मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अर्जदार प्रकाश टिकाराम बोरोल , रा.इंदिरानगर,केडगाव,अ.नगर यांना प्रभाग समिती क्रमांक-४,वॉर्ड क्रमांक ३४, बील क्रमांक ४५२ कर आकारणी केलेली सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ दोन वर्षाच्या घरपट्टी कराची एकूण रक्कम रूपये १९,८७२/-निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ३७ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ३७ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६ दि.४/५/२०१३ अन्वये अर्जदार अफाली फार्मासिटीकल्स लिमिटेड, रा. बुरूडगांव रोड,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-४,वॉर्ड क्रमांक २१, बील क्रमांक २४९ आकारणी केलेली सन २००३-२०१३ अखेर पाणी पट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा बुरूडगाव प्रभाग समिती क्र.४ जा.क्र.३४१४ दि.२/५/२०१४

विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, वॉर्ड नं.२१ बिल नं.२४९ मिळकत धारक अफाली फार्मासिटीकल लि. यांनी दि.२७/१/२०१० रोजी अर्ज सादर करून कळविले आहे की, आमचे मिळकतीवर नळ कनेक्शन नसतांना महानगरपालिकेने आम्हास पाणीपट्टीचे बिल पाठविले आहे. बिल नं.२४९ या मिळकतीमध्ये आमची स्वतःची विहिर आहे. आम्ही त्या विहिरीचे पाणी पित आहोत. सन २००३-२००४ पासुन वरील मिळकतीवर एक ही नळ कनेक्शन अस्तीत्वात नाही. आकारण्यात आलेली पाणीपट्टी रद्द करावी असा अर्ज अर्जदाराने दिला आहे. महानगरपालिका फिटर यांनी दि.१४/१२/२०१२ रोजी समक्ष स्थळ पहाणी केली असता बिल नं.२४९ या मिळकतीवर नळ कनेक्शन नसल्याचे आढळुन आले नाही. असा अभिप्राय दिला आहे. तसेच प्रभाग अधिकारी आणि प्रभाग अभियंता यांनी दि.२१/२/२०१३ रोजी समक्ष स्थळ पहाणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळुन आले नाही. अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने वसुल न होणारी रक्कम रू.९७२०००/- तसेच त्यावरील शास्ती निर्लेखित करणे विषयी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे दि.२५/३/२०१३ रोजी पाठविला होता. मा.स्थायी समिती सभा क्र.२ दि.४/५/२०१३ रोजी सदर विषयावर चर्चा होउन अर्जदार यांनी मा.न्यायालयात रे.मु.नं.१०७२/२०१२ अन्वये दावा दाखल केला आहे तो अद्याप न्यायप्रविष्ट आहे. प्रस्तावासोबत आवश्यक ती कागदपत्रे तसेच मनपा विधी तज्ञाची कायदेशीर मतासह प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यामुळे महापालिकेच्या पॅनल वरील विधी तज्ञ यांचे मतासह सविस्तर प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा.

मा.स्थायी समितीच्या आदेशान्वये जा.क्र.६८८५ दि.२०/८/२०१३ रोजी कायदातज्ञ महानगरपालिका यांचेकडे संपुर्ण संचिका अभिप्रायासाठी पाठविली असता त्यांनी दि.२७/८/२०१३ रोजी त्यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

मिळकत धारक यांनी सदर कनेक्शन बंद करणेबाबत वेळोवेळी अर्ज दिले आहेत. त्यानुसार मनपाने सन २००३ मध्ये सदर कंपनीचे नळ कनेक्शन बंद केले आहे. कनेक्शन बंद करूनही मनपाने सदर मिळकत धारक यांना वेळोवेळी दरवर्षी बिले दिलेली आहेत. सदर मिळकत धारक कंपनी यांना कनेक्शन बंद असतांनाही चुकीची बिले दिलेली आहेत. कनेक्शन बंद केलेली आहेत याबाबत वेळोवेळी अर्ज तक्रारी केलेल्या दिसुन येत आहेत. परंतु मनपाने सदर अर्ज व तक्रारी यांची कुठलीच दखल घेतलेली नाही. उलटपक्षी त्यांना सन २००३-२००४ ते २०१२-२०१३ करीता रू.९७२०००/- चे बिल दिलेले आहे. त्यामुळे सर्व कागदपत्र पहाता कनेक्शन बंद असतांनाही सदर कंपनीस चुकून बिल दिलेली असल्याने मा.स्थायी समिती यांचे मंजुरीने सदरचे बिल

निर्लेखित करणे योग्य ठरेल.असे माझे कायदेशीर मत आहे. तसेच सदर कंपनीने दाखल केलेली रे.मु.नं.१०७२/२०१२ सदरचा दावा काढुन घेण्याच्या अटीवर सदरचा प्रस्ताव मंजुर करणे योग्य ठरेल असे माझे कायदेशीर मत आहे तथापी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा.स्थायी समिती समोर आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. कुमार वाकळे :- फेसादर ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- विषय मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट व मा. विधी सल्लागार यांचे अभिप्रायाप्रमाणे प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** फेरसादर ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार अफाली फार्मासिटीकल्स लिमिटेड, रा. बुरूडगांव रोड,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-४,वॉर्ड क्रमांक २१, बील क्रमांक २४९ आकारणी केलेली सन २००३-२००४ ते २०१२-२०१३ करिता पाणी पट्टी रक्कम रूपये ९,७२,०००/-निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

तथापी सदर कंपनीने दाखल केलेली रे.मु.नं.१०७२/२०१२ सदरचा दावा काढुन घेण्याच्या अटीवर ठराव मंजूर करण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्टानुसार व मा. विधी सल्लागार यांचे अभिप्रायाप्रमाणे सदर रक्कम निर्लेखित करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अजिंक्य बारेकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ३८ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ३८ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये रस्ता बाजू मांडणी फी, स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर ई -निविदा पध्दतीने देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा मार्केट विभाग जा.क्र.४७ दि.२१/५/२०१४

विनंती रिपोर्ट की, रस्ता बाजू मांडणी फी, स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर ई- निविदा क्र.७०८ दिनांक ५/४/२०१४ अन्वये जाहिरात क्र.२ दैनिक लोकमंथन व सार्वमत या दोन वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर निविदेची अंतिम मुदत दि.१९/४/२०१४ अखेर होती. मुदतीमध्ये खालील ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१. श्री. विजयकुमार कुंडलिक म्हस्के
२. मे. एक्झिम पेस्ट कंट्रोल
३. साईपेस्ट कंट्रोल

प्राप्त झालेल्या निविदेची तांत्रिक लिफाफ्यामधील आवश्यक कागदपत्राचा तक्ता खालीलप्रमाणे.

| अ नं. | तांत्रिक लिफाफ्यामधील आवश्यक कागदपत्रे | श्री. विजयकुमार कुंडलिक म्हस्के | मे. एक्झिम पेस्ट कंट्रोल | साईपेस्ट कंट्रोल |
|---|---|---|---|---|
| १ | निविदाधारकास किमान १ वर्षाचा रस्ता बाजू मांडणी फी वसुलीचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. त्याबाबत अनुभवाचे कागदपत्र सोबत जोडावेत. | नाही | अहमदनगर महानगरपालिका कडील अनुभव दाखला जोडला आहे. | अहमदनगर महानगरपालिका कडील अनुभव दाखला जोडला आहे. |
| २ | मागील ३ वर्षाचे लेखा विवरणपत्राच्या प्रती जोडाव्यात | आहे | आहे | आहे |
| ३ | पॅनकार्डाची स्वाक्षांकित प्रत जोडावी | आहे | आहे | आहे |
| ४ | शॉप ॲक्ट लायसेन्स प्रत | आहे | आहे | आहे |
| ५ | बयाणा रक्कम भरली | आहे | आहे | आहे |

वरील प्रमाणे तांत्रिक लिफाफे ग्राहय असल्याने सदरच्या तिनही निविदेचे व्यापारी लिफाफे उघडण्याबाबत मा.छाननी समितीने मान्यता दिलेली आहे.

आज दिनांक २/५/२०१४ रोजी दुपारी ५.४० वाजता मा.छाननी समिती समोर तसेच निविदा आलेल्या एजन्सी व प्रतिनिधी यांच्या समक्ष व्यापारी लिफाफे उघडण्यात आलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | देकार रक्कम |
|---|---|---|
| १ | श्री. विजयकुमार कुंडलिक म्हस्के | ५४,११,०००/- |
| २ | साई पेस्ट कंट्रोल | ३९,११,०००/- |
| ३ | मे.एक्झिम पेस्ट कंट्रोल | ३८,८१,०००/- |

तरी सदर तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमांत १. श्री. विजयकुमार कुंडलिक म्हस्के यांची देकार किंमत रूपये ५४,११,०००/- (अक्षरी रूपये चौपन्न लाख अकरा हजार फक्त) ही सर्वात जास्त देकार रक्कमेची निविदा प्राप्त झालेली असून या रक्कमेचा प्रस्ताव निविदेतील अटी व शर्तीनुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव घेण्यासाठी मा.आयुक्त साहेब, यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी सदरच्या प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे घेण्याबाबत आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रस्ता बाजू मांडणी फी, स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर ई -निविदा पध्दतीने देणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववा.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- ३ निविदा आहेत. निविदा मुदत दि.१९/४/२०१४ पर्यत होती. रूपये ५४ लाख ११ हजारची जास्तीची आहे.

मा.श्री.दिप चव्हाण व मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- देकार किती

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- रूपये ३९ लाख देकार रक्कम होती त्यात रू.१६ लाख जास्त आली.

मा.श्री. दिप चव्हाण :- मागच्या ठेकेदाराची मुदतवाढ किती काळासाठी होती. ते कुणाचे होते. ऑफिस रिपोर्टमध्ये शेरा कुणी मारला आहे. जर वाढीव दराप्रमाणे असेल तर ठिक आहे. नाहीतर तीच पध्दत चालू राहिल.

मार्केट विभाग श्री. गोसावी :- दि.१९/४/२०१४ ला मुदत संपत आहे. फेरनिविदा प्रसिध्द करणेस येणा-या खर्चास मंजूरी मिळणे. पुढील ठेका देईपर्यत १०% वाढ देउन मुदतवाढ देणे व निविदा प्रसिध्द करणे.यावर शेरा मा.बेहेरे साहेबांचा आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- याचा अर्थ पारगमनचे चुकले आहे. हे कायदाप्रमाणेचे काय करतात. १ टेंडरला १०% वाढीवने मुदतवाढ देतात. दुसरीकडे नाही .एकाच संस्थेमध्ये २ कायदे राहणार नाही ना ?

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ज्याचे जास्त दराने टेंडर आले आहे त्या श्री. विजयकुमार कुंडलिक म्हस्के यांनाऑफीस रिपोर्ट प्रमाणे मंजूर करण्यात यावा

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- ऑफीस रिपोर्ट प्रमाणे मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये रस्ता बाजू मांडणी फी, स्लॉटर फी वसुली खाजगी तत्वावर ई -निविदा पध्दतीने मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्टानुसार सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील निर्णय घेण्यात येत आहे.

श्री. विजयकुमार कुंडलिक म्हस्के यांनी मान्य केलेली किंमत रूपये ५४,११,०००/- (अक्षरी रूपये चौपन्न लाख अकरा हजार फक्त) ही सर्वात जास्त रक्कमेची ई-निविदा क्रमांक ७०८ प्राप्त झालेली असून या रक्कमेचा प्रस्ताव निविदेतील अटी - शर्तीनुसार व ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ३९ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ३९ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. मुलतानचंद बोरा, ट्रस्ट संचालित अमरधाम स्मशानभुमी येथील विद्युत दाहिनीचे बील अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ. नगर मनपा आरोग्य विभाग दि.२९/३/२०१४

संदर्भ - मा. आयुक्त साहेब यांचे मंजुरीने आरोग्य जा.क्र. १२९९ दि.३०/३/२०१३ चा कार्यादेश

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये सादर करण्यात येते की,अहमदनगर महानगरपालिके मार्फत अहमदनगर शहरातील नागरिकांच्या मयताचे मोफत अंत्यविधी (विद्युत दहन)१ एप्रिल२०१३ पासून सुरू करण्यात आले आहे.त्या अन्वये अमरधाम स्मशानभूमी येथील श्री.मुलतानचंद बोरा ट्रस्ट विद्युत दहन सेवा मोफत देत आहे.सदरची सेवा मोफत देणेकामी श्री. मुलतानचंद बोरा ट्रस्ट यांनी प्रती विद्युत दहन रू.१२००/- महानगरपालिकेतर्फे अदा करण्याचे कार्यादेश मा.आयुक्त साहेब यांच्या मंजूर प्रस्तावानुसार देण्यात आले होते.

१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ मध्ये एकूण ४६९ मयत व्यक्तींचे विद्युत दाहिनीमध्ये दहन केले असून त्यापोटी रू.१२००x४६९= रू.५,६२,८००/- (रूपये पाच लाख बासष्ट हजार आठशे फक्त) रक्कम महानगरपालिकेकडून अदा करावयाची आहे.

मात्र श्री. मुलतानचंद बोरा ट्रस्ट यांनी मा.आयुक्त साहेब यांना पत्र देवून विद्युत दाहिनीचे मासिक वीज बील रू. ६० हजार ते ८० हजार व कर्मचा-यांचे मासिक वेतन अंदाजे रू.२४,०००/- असे एकूण खर्चाचा भार मनपाने स्वीकारावा आणि दाहिनीचे दुरूस्ती व देखभालीचा खर्च ट्रस्ट करेल व सर्व अंत्यविधी मोफत करण्यात येतील असे पत्र दिले. सदर पत्रावर वेळोवेळी झालेल्या बैठकांमध्ये हा निर्णय धोरणात्मक असल्या कारणाने मा.स्थायी समिती / मा. महासभा यांचेपुढे चर्चेस्तव येणे आवश्यक असल्याने याबाबतीत निर्णय होवू शकला नाही. मात्र मनपा प्रती दहन रू.१२००/- शुल्क अदा करण्यास तयार असून सुध्दा सदर ट्रस्टनी एकत्रीत बील / देयके ट्रस्टच्य नियमानुसार स्वीकारता येत नाही असे स्पष्ट केले. तसेच ट्रस्ट प्रतिनिधी यांनी मासीक वीज बीलाच्या पन्नास टक्के रक्कम म.न.पा.ने अदा करावे असे सुचविले मात्र याबाबतही चर्चेअंती निर्णय होवून शकला नाही. त्यामुळे मोफत विद्युत दहन सेवा सुरू असूनही देयके अदा करता आलेली नाही.

या दरम्यान चार महिन्यापूर्वी आणि मागील आठवडयामध्ये विद्युत दाहिनीचे वीज बील १ एप्रिल २०१३ पासून थकीत असल्याने महावितरण कार्यालयाने विद्युत दाहिनीचे वीज जोडणी तोडून वीज पुरवठा खंडीत केला. चार महिन्यापूर्वी मनपा विद्युत विभागामार्फत रू.५०,०००/- वीज बील अदा करून विद्युत पुरवठा सुरू केला. थकीत वीज बील अदा करणेस वाढीव मुदत घेण्यात आली. परंतु त्यानंतर सुध्दा मनपा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता तद्नंतर स्थायी समिती गठीत न झाल्याने आणि सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीची आदर्श आचारसंहितेमुळे यावर निर्णय होवू शकला नाही.

या आठवडयामध्ये विद्युत दाहिनीची वीज जोडणी तोडून पुरवठा खंडीत झाल्याने नागरिक व लोक प्रतिनिधी यांचा मनपा प्रशासन विरोधी रोष निर्माण झाला आहे.त्यामुळे प्राप्त अहवालानुसार १ एप्रिल २०१३ ते ३१मार्च२०१४अखेर झालेल्या विद्युत दहनापोटी रू.५,६२,८००/-रकमेपैकी रू.३,५०,०००/-रक्कम महावितरण कडे वीज बीलापोटी तातडीने भरल्यास विद्युत पुरवठा सुरळीत होईलअसे विद्युत विभागाकडून कळविले आहे. त्यानुसार रू.३,५०,०००/- महावितरणच्या नावे धनादेश काढणेस लेखा विभागास आदेशार्थ. तसेच विद्युत

दाहिनीच्या मासिक वीज बीलापोटीच्या खर्चाचा आर्थिक भार किती प्रमाणात मनपाने कायमस्वरूपी स्वीकारावा याबाबत सदरचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे चर्चेस्तव घेणेस मंजुरीस्तव सविनय सादर./**अ**

मनपा मंजुर बजेट सन २०१३-२०१४

लेखाशिर्ष :- अंत्यविधी खर्च योजना

एकूण तरतुद :- ३०,००,०००/-

झालेला खर्च :- १८,१५,०००/-

शिल्लक तरतूद :- ११,८५,०००/-

येणेप्रमाणे प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे अमरधाम स्मशानभूमी नालेगांव येथील विदयुत दाहिनीचे वीज बीलापोटी रक्कम रूपये ३,५०,०००/- महाराष्ट्र राज्य वितरण वीज कंपनीकडे अदा करणेस व विदयुत दाहिनीचे वीज बीलापोटी किती रक्कम मनपाने भरावी याबाबत निर्णयाकरिता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार तूर्त रू.३.५० लक्ष भरणा करणेस व यापुढे किती प्रमाणात दरमहा बील भरले याविषयी प्रस्ताव मे.स्थायी समिती सभेत ठेवणेसाठी मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, नमूद बाबी संदर्भात सादर केलेला अहवाल व त्यावरील उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय यांचे अवलोकन केले नमूद बाब ही शहरातील नागरिकांच्या अंत्यविधीशी संलग्न असलेने त्यातील गांभीर्य विचारात येउन प्रस्तावीत केलेनुसार अपवादात्मक स्थितीत मान्यता देणेत येते. मात्र सदरहू बाब ही मे. स्थायी समिती व मे. महासभेचे निदर्शनास आणणेत यावी.

| **विद्युत दाहिनी सन २०१३-२०१४** | | |
|---|---|---|
| १ | १/४/२०१३ ते ३०/४/२०१३ | ३३ |
| २ | १/५/२०१३ ते ३१/०५/२०१३ | ४४ |
| ३ | १/६/२०१३ ते ३०/६/२०१३ | ३५ |
| ४ | १/७/२०१३ ते ३१/७/२०१३ | ४९ |
| ५ | १/८/२०१३ ते ३०/८/२०१३ | ३५ |
| ६ | १/९/२०१३ ते ३०/९/२०१३ | ४९ |
| ७ | १/१०/२०१३ ते ३१/१०/२०१३ | ४५ |
| ८ | १/११/२०१३ ते ३०/११/२०१३ | ३६ |
| ९ | १/१२/२०१३ ते ३१/१२/२०१३ | ५६ |
| १० | १/१/२०१४ ते ३१/१/२०१४ | ४६ |
| ११ | १/२/२०१४ ते २८/२/२०१४ | ३४ |
| १२ | १/३/२०१४ ते ३१/३/२०१४ | ७ |
| | एकुण | ४६९ |

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अमरधाम स्मशानभुमी येथील विद्युत दाहिनीचे बील अदा करणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

आरोग्याधिकारी डॉ. राजूरकर :- मोफत अंत्यविधी मध्ये विदयुत दाहिनी मोफत साठी आहे. लाकडी अंत्यविधी मोफत बंद केलेले आहे. लाईट बिल मनपाच्या नावावर घेणे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- त्यांचे अजून काही मुद्दे आहे का ?

मा.श्री. दिप चव्हाण :- मनपाच्या नावाने नवीन बिल घेवून ते बिल आपण अदा करणार. महासभेतील निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्टास मंजूर करावा. अंदाजपत्रकीय महासभेतील निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- अंदाजपत्रकीय महासभेतील निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

मा.सभापती साहेब :-ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. अंदाजपत्रकीय महासभेतील निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :-** श्री. मुलतानचंद बोरा, ट्रस्ट संचालित अमरधाम स्मशानभुमी येथील विद्युत दाहिनीचे बील अदा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट व चर्चे नुसार रू.१२००x४६९= रू.५,६२,८००/- (रूपये पाच लाख बासष्ट हजार आठशे फक्त) रक्कम महानगरपालिकेकडून अदा करावयाची आहे. त्याबाबत अंदाजपत्रकीय महासभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद केल्याप्रमाणे सदरची बाब मा. महासभेच्या निदर्शनास आणणेत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ४० मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ४० मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या अहमदनगर शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदी करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास पुढील सहा महिन्याकरीता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये २,९६,०००/- मानधन रकमेचे खर्चास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ. नगर मनपा नगररचना विभाग

*अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीचे नोंदी अदयावत करण्याचे कामा साठी कार्यरत असलेल्या स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकाचे स्थाई समिती महानगरपालिका यांनी क्रमांक* १३५ दिनांक २३/१०/२०१३ चे ठरावा प्रमाणे त्यांना त्यांचे कामाची ६ महिन्या करीता मुदत वाढ मंजूर केलेली आहे. सदरची मुदत दिनांक ०६/०५/२०१४ रोजी संपुष्टात येत आहे. प्रथक प्रमुख श्री.एस.बी.शिंदे यांनी पुढील ६ महिन्याचे कालावधी करीता पुर्वीचे मंजुर दराने काम करणेस तयार असलेचे पत्र दिलेले आहे.

स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकातील अधिकारी / कर्मचारी यांनी केलेल्या व करावयाचे प्रलंबित कामाची माहिती खालील प्रमाणे दिलेली आहे.

| अ.नं. | | खुल्या / इमारती इ. संख्या | रस्ते संख्या |
|---|---|---|---|
| १. | महानगरपालिकेच्या नांवाने झालेल्या मिळकती | ९६७ | १०६१ |
| २. | नोंदी साठी प्रलंबीत असलेल्या मिळकती. | ५८८ | ३०५ |
| | एकूण मिळकती | १५५५ | १३५४ |

**<u>नोंदी साठी प्रलंबीत प्रकरणाचा तपशील.</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कामगार तलाठी / नगर भूमापन अधिकारी यांचे कडे नोंदी घेणे व ७/१२ ला ,मिळकत पत्रीकेला अंमल घेणे | २९५ | १५१ |
| २. | नोंदी व दुरुस्ती साठी कार्यालया कडुन पाठविणेवर | २९३ | १५४ |
| | एकूण | ५८८ | ३०५ |

**<u>पथकाने आता पर्यत खालील प्रमाणे काम केलेले आहे.</u>**

*१. मिळकतीस नोंदी साठी पाठविलेली प्रकरणे मा.तहसिलदार यांचे कडुन कामगार तलाठी यांना प्राप्त झाल्या नंतर फेरफारच्या नोंद वहित नोंदी घेतल्या जातात व त्यानंतर साधारण २- ३ महिन्यानी मंडलाधिकारी यांचे कडून नोंदी मंजूर केल्या जातात. व मंजूर फेरफार प्रमाणे त्याचा अंमल ७/१२ला घेतला जातो . परंतु प्रत्येक्षात नोंदी मंजूर होउनही तलाठी यांचे कडून लगेच ७/१२ला नोंदी घेतल्या जात नाहीत म्हणून पथकातील अधिकारी /कर्मचारी यांनी माळीवाडा ,नालेगांव ,केडगांव ,भिस्तबाग,बोल्हेगांव येथील तलाठी कार्यालयात जावुन मंजूर फेरफार प्रमाणे प्रत्येक ७/१२ ला` खुल्या जागा ८१९ व रस्ते १०४९ एकुण १८६८ मिळकतीच्या महानगरपालिकेच्या नांवाच्या नोंदी७/१२ ला बरोबर घेतले बाबतची संबंधित कागदपत्रावरुन खात्री करुन घेतलेली आहे.*

२. त्याच प्रमाणे नगर भूमापन अधिकारी यांनी सिटी सर्व्हे नंबर पैकी पाठविलेल्या प्रकरणात १४८ प्रकरणात महानगरपालिकेच्या नांवाची नोंद केली असल्याची कागदपत्र पाहुन खात्री करुन घेतलेली आहे.

३. सिटी सर्व्हे नंबर ७३९७-अ मधील खुली जागा १५ गुंठे क्षेत्राची बेकायदेशीर दिलेले खरेदी खत रदद करणे बाबतचे दाव्यात आवश्यक ते कागदपत्र व मिळकतीची माहिती संबंधित वकीलास तयार करुन दिलेले आहे .त्याचप्रमाणे या मिळकती बाबत मा.जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, यांचेकडे चालु असलेल्या अपीलात म्हणणे व कागदपत्र दाखल केलेले आहे.

४. सिटी सर्व्हे नंबर ४७७० -अ/२ मधील ७ मिळकतीस व नगर रचना योजना क्रमांक-४ मधील आरक्षीत भूखंड क्रमांक १११ ला पालिकेच्या नांवाची नोंद करणे बाबत ची मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठात पालिकेचे वकीला मार्फत दाखल केलेल्या याचीकेत मिळकतीची सविस्तर माहिती व पुराव्या बाबतचे कागदपत्र संबंधित वकीलास वेळोवेळी दिलेले आहे.

५. सिटी सर्व्हे नंबर ४२१-अ मधील मिळकती बाबत नगर भूमापन अधिकारी अहमदनगर यांनी फेरचौकशीत ,चुकीचा व बेकायदेशीर दिलेल्या निर्णया विरुध्द मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख [महाराष्ट्र राज्य ]पुणे यांचे कडे पुनर्विलोकनाचा अर्ज दाखल केलेला आहे.

६. मौजे- पिंपळगांव माळवी येथील तलावा साठी संपादीत ७०० एकर क्षेत्रास पालिकेच्या नांवाची नोंद करणे बाबतचा मा.अप्पर जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी आदेश दिलेला आहे व प्रकरण पुढील कार्यवाही साठी मा.जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांचे कडेस पाठविलेले आहे. या मध्ये संबंधित कार्यालयाशी वारंवार संपर्क केलेला आहे व मागणी प्रमाणे कागदपत्र द ाखल केलेले आहेत.

७. वाकोडी / चाहुराणा बु. येथील भू-गटार योजने साठी संपादन केलेल्या ९ प्रकरणातील २५ एकर क्षेत्राचा मा.जिवन प्राधिकरणाच्या नावांचा ७/१२ तयार करुन घेतलेला आहे. व योजना हास्तांतरा साठी ताबे पावती घेणे साठी जिवन प्राधिकरणाच्या कार्यालयाशी पत्रव्यवहार करुन समक्ष संपर्क केलेला आहे.

८.  नगररचना योजना क्रमांक ३ व ४मधील मंजूर केलेल्या रेखांकनातील ३० मिळकतीचे रेखांकन ,जुने बंद ७/१२, फेरफार प्राप्त करुन घेवुन नोंदीसाठी प्रकरणे नगर भूमापन अधिकारी यांचेकडेस पाठविलेली आहेत.

९.  पथकातील भू-करमापक यांनी पालिकेतील सर्व विभागाकडून आता पर्यत प्राप्त झालेल्या एकूण १७६० मिळकतीची प्रत्यक्ष जागेवर जावुन मोजणी करुन हददी निश्‍चित करुन संबंधितस अहवाल दिलेला आहे. त्याच प्रमाणे पाणि पुरवठा फेज-२ चे कामा साठी तयार करण्याचे योजनेतील पालिका हददीतील २३ रस्त्याचे दोन्ही बाजु कडील त्यावरील ७८० मिळकतीची मोजणी केलेली आहे. व रेखांकना प्रमाणे ठंकेद ार व पाणी पुवठातील अधिकारी यांना समक्ष  रस्त्याच्या हददी दाखवुन दिलेल्या आहेत.

## प्रलंबित प्रकरणात करावयाची कामे

**१.**  महानगरपालिकेच्या नांवाने झालेल्या खुल्या जागा ९६७ व रस्ते १०६१ आशा पैकी  २०२८ मिळकतीचे ७/१२ व मिळकत पत्रीकेच्या नक्कला / उतारे काढुन घेणे व  प्रत्येक मिळकतीची द्वि- नोंद पध्दती मध्ये विही त केलेल्या प्रपत्रात प्रत्येक मिळकतीची स्वतंत्र माहिती संगणकीकृत करावयाची आहे.

**२.**  कामगार तलाठी व नगर भूमापन अधिकारी यांचे कडे प्रलंबित असलेल्या खुली जागा २९५ व रस्ते १५१  अशा एकूण ४४६ मिळकती बाबत त्यांचेशी संपर्क साधून पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

**३.**  नोंदी व दुरुस्ती साठी कार्यालया कडुन पाठविणेवर प्रलंबित असलेल्या  खुली जागा २९३ + रस्ते १५४ असे एकुण -४४७ प्रकरणे तयार करणे साठी मंजूर रेखांकन ,७/१२ ,मिळकत पत्रीका उपलब्ध करुन घ्यावे लागणार आहे. यापैकी  ५१ मिळकतीचे ताबे पावत्या करुन घ्यावयाचे आहेत.

**४.**  वाकोडी येथील भूयार गटार योजने साठी संपादन केलेल्या ९ प्रकरणातील २५ एकर क्षेत्राची ७/१२ ला नोंद करण्यासाठी जीवन प्राधिकरणा कडील  ताबे पावती वरुन प्रस्ताव तयार करुन पुढील कार्यवाही साठी मा.तहसिलदार यांचे कडेस पाठवावी लागणार आहेत.

**५.**  मा.उप अधिक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांचे कर्डील आदेश  मिळाले नंतर  मौजे-पिंपळगांव माळवी तलावा साठी संपादन केलेल्या ७०० एकर क्षेत्राचा महानगरपालिकेच्या नांवाने नविन ७/१२ तयार करणे साठी पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

**६.**  सिटी सर्व्हे नंबर ४७७०-अ, ४२१-अ,७३९७-अ, नगर रचना योजना क्रमांक-४ मधील आरक्षीत भूखंड क्रमांक १११  मध्ये चालु असलेल्या अपीलात व याचीकेत संबंधिताच्या प्रादेशा प्रमाणे या प्रकरणात पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

**७.** महानगरपालिका नांवाने झालेल्या ९६७ खुल्या जागेची मोजणी करुन काही दोष आढळून आल्यास पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

अतिक्रमण ,बांधकाम ,नगर रचना विभाग यांचे कडून प्राप्त होणा-या प्रकरणात व पाणी पुरवठा फेज-२ योजनेतील कामा साठी संबंधित रस्त्याच्या रेखांकना प्रमाणे मोजणी करणे आवश्यक आहे.रस्त्याचा हददी निश्चित झाल्या खेरीज योजनेतील फेज-२ची कामे करता येणार नाहीत.कार्यालयात तांत्रीक कर्मचारी नसल्याने वरील कामा साठी पथकातील सर्व्हेअर यांची सातत्याने गरज भासते. त्यांना दिलेल्या कामा व्यतीरिक्त सर्व विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रकरणात त्यांचे कडून आवश्यकतेनुसार मोजणीचे काम करवून घेतले जाते.

स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकातील अधिकारी / कर्मचारी यांनी नियमीत पणे कार्यालयात येवून काम केलेले आहे. कामाच्या मोबदल्यात त्यांना आदा केलेली रक्कम फारमोठया प्रमाणात व अनाठायी नसुन ती पालिकेच्या महत्वाचे व आवश्यक त्या कामा साठीच खर्च झालेली आहे. त्यांनी आता पर्यत केलेल्या कामा मुळे पालिकेच्या मिळकतीचे रेकॉर्ड अदयावत झालेले आहे. त्या कोणत्याही मिळकतीवर विकास कामे करणेस पालिकेस तांत्रीक अडचण निर्माण होणार नाही अशाच पध्दतीने प्रलंबित मिळकतीचे नोंदीचे काम पुर्ण करणे महत्वाचे आहे.

पालिकेच्या मिळकती बाबतची सर्व माहिती पथकातील अधिकारी / कर्मचारी यांना झालेली आहे.त्या साठी प्रस्तावात नमुद केलेले मिळकतीचे प्रलंबित नोंदीचे काम बिनचुक व एक सुत्रीपणे पुर्ण करणे साठी तसेच सर्व खुल्या जागेच्या मोजणी करुन हददी निश्चित करणे साठी त्यांचे सेवेची आवश्यकता असल्याने दिनांक ०६/०५/२०१४ पासुन पुढील सहा महिने कालावधी करीता मुदतवाढ व त्यासाठी येणा-या खर्चाची रक्कम रुपये २,९६,०००/- यास मान्यता मिळणे साठी मा स्थायी समीती कडे प्रस्ताव सादर करणेस हरकत नाही. तसेच सदर खर्च मानधन [आस्थापना] या बजेट हेड खाली खर्च करण्यास मंजूरी मिळावी ही विनंती **/अ**

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

मानधन [आस्थापना]- सन २०१४-१५
बजेट तरतूद- ५६,१०,०००/-
*खर्च - ४९,३३०/-*
*शिल्लक तरतुद- ५५,६०,६७०/-*

*यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, यापूर्वीच्या जा.नं.टी.पी. ९५३३ /२०१३दि.६/११/२०१३ नुसार कार्यारंभ आदेश देतांना साठीचे निविदा दर व पथकातील कार्यरत कर्मचा-यांचा तक्ता व त्यांचे दिलेले मानधन याची माहिती सादर करा.*

*यावर प्र. नगररचनाकार यांचा अभिप्राय की, सादर , सदर पथकात रि. तहसिलदार, नायब तहसिलदार व दोन भुमापक असे एकुण चार जण असुन, पथक प्रमुखास दरमहा रूपये ४९,३३०/- याप्रमाणे सर्वांचे मिळुन मानधन अदा केले जाते. माहितीसतव सादर.*

*यावर नगररचना विभाग यांचा अभिप्राय की, प्रभारी नगररचनाकार यांचे प्रस्तावास "अ" प्रमाणे मान्यता देणेस मान्यतेस्तव सादर.*

*यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, १] निविदा करारनाम्यानुसार मुदतीत काम पुर्ण न होण्याची कारणे काय? , २] यापुढे काम पुर्ण होण्यास निश्चित किती कालावधी लागणार आहे., ३] टप्पा मुदतवाढीबाबत तरतुद दर्शवावी.,४] मूळ निविदेसह प्रस्ताव सादर करावा., ५] प्रलंबित कामाची यादी सोबत जोडावी.*

१. नगर पालिका हददीतील सन -१९९५ पुर्वी मंजूर केलेल्या रेखांकनातील ७८० व त्यानंतर मंजूर रेखांकनातील सुमारे ६०० पर्यतच्या अशा एकूण १४०० पर्यतच्या खुल्या जागा मुळ मालकाच्या नांवाने होत्या. त्या हस्तांतरीत करुन घेणेसाठी महसूल व भूमि अभिलेख खात्यातील सेवा निवृत्त तहसिलदार ,नायब तहसिलदार ,सर्व्हेअर यांची नियुक्ती करणे बाबत नगर पालिकेने ठरविले होते. त्याप्रमाणे या कामा साठी ठराव क्रमांक १८ दिनांक २८/०७/२००९ अन्वये महानगरपालिकेच्या मिळकतीवर महानगरपालिकेचे नांव लावणे कामी तज्ञ अधिका-यांची कंत्राटी पध्दतीने जाहीर निविदा मागवून ६ महिन्याचे कालावधी करीता नेमणूक करण्यास व त्या साठी येणा-या खर्चास स्थायी समीती कडील ठराव क्रमांक १८ दिनांक २८/०७/२००९ अन्वेय मंजूरी देणेत आलेली होती . त्याच प्रमाणे ६ महिने करीता येणारे खर्चाच्या रक्कमेस मंजूरी दिलेली होती.

स्थायी समिीचे मंजूरी प्रमाणे दिनांक २८/१०/२००९ अन्वये कामाची संयुक्त जाहीर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या .जाहिर निविदे प्रमाणे श्री.एस.बी.शिंदे ,सेवा निवृत्त तहसिलदार व इतर तीन यांची प्राप्त झालेली संयुक्त निविदा कमी दराची रुपये २,९६,०००/--ची सहा महिन्या करीता मंजूर करुन क्रमांक जा.क्र.आस्था/कंत्राटी नेमणूक /२६९७ दिनांक १७/११/२००९ अन्वये ६ महिन्या करीता कार्यरंभ आदेश देणेत आलेला आहे. त्याप्रमाणे त्यांचे कडून करारनामा करुन घेणेत आलेला आहे.

पुर्वी पालिकेच्या कार्यालयात मिळकतीची कोणत्याही प्रकाची माहिती व कागदपत्र उपलब्ध नव्हती. पथकातील अधिकारी कर्मचारी , यांनी प्रत्यक्ष संबंधित खात्याचे कार्यालयात जाउुन ७/१२ उतारे ,मिळकत पत्रिका यांच्या नक्कला व कागद पत्र प्राप्त करुन घेउन मिळकतीच्या घेतलेल्या नोंदी प्रमाणे पालिकेच्या खुल्या जागा , इमारती इत्यादी एकूण १५०० पर्यत मिळकती असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यापैकी आतापर्यत ९०० मिळकतीस नोंदी लावण्याची कार्यवाही पुर्ण केलेली आहे.

दिनांक १९/०५/२०१४ अन्वये उपस्थित केलेल्या मुदयावरील माहिती खालील प्रमाणे आहे.

१.A मिळकतीची संख्या मोठया प्रमाणात असल्याने व नोंदीचे काम दुस-या खात्याकडुन करुन घ्यावयाचे असल्याने करार नाम्यात काम पुर्ण करण्याचा कालावधी नमुद केलेला नाही.

२. रेखांकनातील जागा हस्तांतर करुन घेणे साठी खरेदी खत हक्कसोड पत्रक इत्यादी नोंदणीकृत दस्त ऐवज असल्याखेरीज जागा हस्तांतर केल्या जात नाही. परंतु सदयास्थितीत ते शक्य होत नसल्याने पालिकेने पथका मार्फत संबंधिता कडून ताबेपावती करुन घेवुन हस्तांतर करुन घेणे बाबतचे धोरण निश्चित केलेले आहे. त्या प्रमाणे संबंधित इसमा कडे समक्ष जावुन ताबे पावत्या करुन घ्यावे लागतात. प्राप्त ताबे पावत्या सह प्रकरणे मा.तहसिलदार यांचे कडेस पाठविले जातात व सदरचे प्रकरणे त्यांचे मार्फत तलाठी यांचे कडे कार्यवाही साठी पाठविली जातात प्रकरणे प्राप्त झाल्या नंतर तलाठी यांचे कडून नमुना ६फेरफारला नोंदी घेतल्या जातात व त्यानंतर त्यानोंदी मंडळाधिकारी यांचे कडून साधरण पणे २-३ महिन्या नंतर त्या नोंदीवर कार्यवाही केली जाते. मंजूर नोंदी प्रमाणे ७/१२ ला अंमल घेतला अगर कसे अथवा नोंद ना-मंजूर केल्यास त्याप्रमाणे समक्ष भेटून पुढील कार्यवाही करावी लागते. अशा प्रकारची प्रत्येक मिळकतीच्या नोंदी बाबतची कार्य प्रणाली आहे.नोंदी बाबतचे काम हे दुस-या कार्यालयावर अवलंबून असल्याने सर्व कामे एकाच वेळी पुर्ण करुन घेणे शक्य होत नाही.

तसेच पथकातील सर्व्हेअर यांना पालिकेतील बांधकाम विभाग अतिक्रमण विभाग ,पाणी पुरवठा विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, नगर रचना विभाग यांचे कडुन प्राप्त झालेल्या प्रकरणात वेळोवेळी मोजणी करुन दयावी लागते. तसेच गेल्या ६ महिन्या पासुन शहर पाणी पुवठा फेज -२ चे कामासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजू कडील मोजणी करुन हददी निश्चित करुन दिलेल्या आहेत. व आजही सदरचे कामकाज चालू आहे .त्यामुळे त्यांचे कडील नोंदीचे कामकाज प्रलंबीत राहत आहे.

B अशा प्रकारे वर नमुद केलेल्या कारणास्तव प्रलंबीत नोंदी बाबतचे काम पुर्ण होणेस निश्चित किती कालावधी लागणार आहे हे सांगता येणार नाही.

३.C स्थावर मिळकत व्यवस्थापन पथकाचे कामाची मुदत व त्यासाठी येणा-या खर्चाची स्थायी समीती यांचे कडून वेळोवेळी मंजूरी घेणेत आलेली आहे.

४.D मुळ निविदा संचिका क्रमांक -२ मधील पान क्रमांक १३ वर आहे.

५. E ५८८ खुल्या व ३०५ रस्ते या मिळकती नोंदी करण्या साठी प्रलंबीत प्रकरणाची माहिती प्रस्तावात नमुद केलेली आहे. तसेच सोबतच्या तक्त्यात फेरफार नंबर नमुद न-केलेल्या मिळकती नोंदी साठी प्रलंबित आहेत. प्रस्तावातील पान क्रमांक-३ वर प्रलंबीत प्रकरणात करावयाच्या कामाची माहिती दिलेली आहे त्याचे अवलोकन करावे .

आता पर्यत पथकातील अधिकारी / कर्मचारी यांनी केलेल्या कामा मुळे मिळकतीवर पालिकेचा मालकी हक्क निश्चित झालेला आहे. त्यामुळे या मिळकतीचे बेकायदेशीर हस्तांतर अथवा विल्हेवाट कोणालाही करता येणार नाही तसेच या जागेवर पालिकेस विकास कामे करताना तांत्रीक अडचण येणार नाही. स्थावर मिळकतीच्या नोंदी साठी नियुक्त केलेल्या पथकावर झालेला खर्च व होणारा खर्च हा अनाठाई नसुन पालिकेच्या हितावह आहे.त्यामुळे पालिकेच्या प्रलंबित कामा साठी त्यांचे सेवेची अवश्यकता आहे.

येणेप्रमाणे प्र.नगररचनाकार यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.मु.ले.प. यांच्या शे-याची पूर्तता यापत्रान्वये त्यातील नमूद ABCD व E अन्वये केलेली आहे.सबब मूळ प्रस्तावातील "अ" नुसार प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर मु.ले.अ. यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे उचित आदेशार्थ.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, सन २०१४-२०१५ आर्थिक वर्षात खर्चाची तरतूद केली आहे. त्यानुसार यथाप्रस्तावीत कालावधीकरिता ६ महिन्यांची मुदतवाढ मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेने करण्यास हरकत नाही. मे.आदेशार्थ सविनय सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- स्थावर मिळकतीस नोंदी करणे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास मुदतवाढ देणेस व नेमणूक देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- लोकांचे पथक किती ?

नगररचना विभाग श्री. जोशी :- ४ लोकांचे पथक आहे.
मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- रूपये २ लाख ९६ हजार किती दिवस
मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- ६ महिन्यांकरिता. त्यांनी ९६७ खुल्या जागा आपल्या नावावर झाल्या आहेत.
मा.श्री. दिप चव्हाण :- मिळकत व्यवस्थापक आस्थापना सुचीवर आहे का ?
आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- नाही.
मा.श्री.दिप चव्हाण :- आस्थापना वर मिळकत व्यवस्थापनावर कुणी आहे का पूर्वीपासून नव्हते. मग कोण काम पहात होतो.ती. पोस्ट वेगळी असेल पण काम तेच आहे.
आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- हेड रजिस्टार म्हणून आहे. इस्टेट प्रॉपर्टी वर क्लार्क वेगळा आहे.
मा.श्री.दिप चव्हाण :- इस्टेट प्रॉपर्टीला क्लर्क कोण आहे.
आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- ऑडीटमध्ये शिंदे मॅडम म्हणून आहे.
मा.श्री.दिप चव्हाण :- तो कोठे आहे.
आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- सध्या ऑडीट मध्ये आहेत.
मा.श्री.दिप चव्हाण :- त्यांना काम द्या.
मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- नवीन स्टाफिंग पॅटर्न मध्ये पद आहे का ?
मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- मिळकत व्यवस्थापकाचे म्हणून पद आहे.
मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- सौभाग्य सदन कार्यालयास सुध्दा पालिकेचे नाव नाही.
मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- शेवटचे ६ महिने मुदत वाढ देता येईल.
मा.श्री. कुमार वाकळे - महानगरपालिकेच्या प्रॉपर्टीना नाव लावण्याचे काम आहे. मुदतवाढ देण्यात यावी.
मा.श्री.शेख फैय्याज - या कर्मचा-यांना मुदत वाढ देण्यात यावी.
मा.सभापती साहेब :- नियमानुसार मुदत वाढ द्या.ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या अहमदनगर शहर हद्दीतील स्थावर मिळकतीस नोंदी करणेबाबतचे कामासाठी नगररचना विभाग कडील मिळकत व्यवस्थापन विभागाकडील पथकास दिनांक ०६/०५/२०१४ पासुन सहा महिन्याकरीता मुदतवाढ देणेस व नेमणूक देणेस व त्याकामीचे रूपये २,९६,०००/- (रूपये दोन लाख शहाण्णव हजार फक्त) या मानधन रकमेचे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख फैय्याज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ४१ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ४१ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ संदर्भात मे.NATIONAL GREEN TRIBUNAL,PUNE यांनी दिनांक ३०/५/२०१४ रोजी दिलेल्या अंतरीम आदेश मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन देणेबाबत

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग जा.क्र.४०दि. ७/६/२०१४

वरील विषयानुसार कळविण्यात येते की, बुरूडगांव येथील स.नं.३४ येथील महानगरपालिकेच्या कचराडेपो संदर्भात मे.NATIONAL GREEN TRIBUNAL,PUNE येथे APPLICATION NO.9 (THC)/2013(WZ) अन्वये श्री. भाउसाहेब भिमाजी कुलट व इतर यांनी दावा दाखल केला आहे. सदर बाबत दिनांक ३०/५/२०१४ रोजी मे. कोर्टात अंतरीम आदेश दिले आहेत. त्यानुसार मा.आयुक्त यांनी सदरच्या आदेश मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन देणे बाबत सुचित केले आहे. आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ येथे निर्माण होणा-या घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व विल्हेवाट करणेसाठी खाजगी एजन्सीची नियुक्ती बाबत मागविण्यात आलेल्या Expression of interest बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करण्यात आलेला आहे.

तरी दिनांक ३०/५/२०१४ रोजीच्या मे.कोर्टाचे आदेश मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन देणेबाबत कार्यवाही करावी.

येणेप्रमाणे उपायुक्त (कर) साहेब यांचे प्रकल्प विभाग जा.क्र.४० दिनांक ७/६/२०१४ रोजीचे त्या सोबतचा दि.३०/५/२०१४ चा ट्रायब्युनलचा आदेश मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- बुरूडगांव स.नं.३४ संदर्भात मे.NATIONAL GREEN TRIBUNAL,PUNE यांनी दिनांक ३०/५/२०१४ रोजी दिलेल्या अंतरीम आदेश मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन देणे विषयी पत्र आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- पत्र वाचून दाखवा. हा विषय कशा करीता आहे.

त्याप्रमाणे सभेमध्ये पत्र वाचून दाखविण्यांत आले.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- लातूरला या संदर्भात गुन्हे दाखल झाले आहेत.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- ट्रायब्युनलचा आदेश मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणून देण्याकरीता आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- पत्राप्रमाणे निदर्शनास आणले.
मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- पत्राप्रमाणे निदर्शनास आणले,मंजूर करावा.
मा.श्री.अजिंक्य बोरकर :- पत्राप्रमाणे प्रमाणे निदर्शनास आणले,मंजूर करा.
मा.सभापती साहेब :- पत्रानुसार निदर्शनास आणले,सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ संदर्भात मे.NATIONAL GREEN TRIBUNAL,PUNE यांनी दिनांक ३०/५/२०१४ रोजी दिलेला अंतरीम आदेश मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन देणेत आला.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ४२ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ४२ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. भागवत विश्वनाथ व्यवहारे, श्री. विलास भाउसाहेब लामखेडे , रा. निंबळक ता.नगर, जि.अ.नगर यांचे सीना नदी पात्रामधील महानगरपालिकेचे मालकीच्या विहीरीमधून पाणी देणेस परवानगी देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर मनपा पाणी पुरवठा विभाग दिनांक २१/४/२०१४

अर्जदार- १. श्री. भगवान विश्वनाथ व्यवहारे,
२. श्री. विलास भाउसाहेब लामखेडे ,
रा. निंबळक ता. नगर

संदर्भ :- दि.२८/०३/२०१४ जा.क्र.३५१६ चा अर्ज

संदर्भीय अर्जान्वये श्री.भगवान व्यवहारे व श्री. विलास लामखेडे या शेतक-यांनी अर्ज देवून कळविले की, सीना नदी पात्रातून पाणी उचलणेसाठी महाराष्ट्र शासन कुकडी पाटबंधारे विभाग यांची परवानगी घेतलेला आहे.सावेडी येथील भुतकरवाडी जुने पंपीग स्टेशन परिसरामध्ये महापालिकेचे मालकीच्या दोन विहीरी आहेत. सध्या त्या पालिकेच्या वापरात नाहीत. एक विहीर पालिकेने पूर्वी एक शेतक-यास वापरण्यास परवानगी दिलेली आहे.

दुसरी विहीर गाळाने बुजून गेलेली आहे. आम्ही स्वखर्चाने गाळ काढून स्वच्छ करून जॅकवेल म्हणून वापरण्यास परवानगी मिळावी याबाबतचा सदर शेतक-यांनी अर्ज देवून कळविले आहे.

त्या अनुषंगाने सादर की, सावेडी पंपीग स्टेशन येथे प्रत्यक्ष पहाणी केली असता या ठिकाणी मनपा मालकीच्या दोन विहीरी असून पूर्वी तत्कालीन नगरपालिका असतांना सदर विहीरीचा वापर होत होता. परंतू मनपास इतर स्त्रोत सुरू झालेनंतर बरेच वर्षापासून सदरचे पंपहाउस बंद आहे. सदर शेतक-यांनी मागणी केलेली विहीरी सिना नदीपात्रात असून गाळाने पूर्ण भरलेली आहे. तसेच तेथील पाणी पिण्यास योग्य नसलेने भविष्यात त्याचा पिण्यासाठी वापर होणार नाही. त्यामुळे सदर शेतक-यांना त्यांनी कुकडी पाटबंधारे क्र.२ श्रीगोंदा अहमदनगर यांनी ज्या अटी शर्ती तसेच मनपाचे खालील अटी शर्तीस अधीन राहून त्यांना परवानगी देणे योग्य वाटते. तथापी आदेशार्थ सादर.

१.इरिगेशन रॉ वॉटर चार्जेस जे नियमाप्रमाणे आहेत ते भरावे लागतील.

२.सदरची परवानगीही ११ महिन्यांसाठी राहील.

३.यदाकदाचीत काही तक्रारी निर्माण झाल्यास अंतीम निर्णय हा मा. आयुक्तांचा राहील.

४.सर्व हक्क हे मनपाचे राहतील.

५.रू. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करून दयावा लागेल.

येणेप्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, अहमदनगर महानगरपालिकेचे मालकीची परंतु सध्या वापरात नसलेली भुतकरवाडी, जुने पंपीग स्टेशन येथील विहीरीतील पाणी अर्जदार यांना नमूद अटी शर्ती नुसार वापरणेस देणेस हकरत नाही. करिता सदरील प्रस्ताव मान्यतेस्तव मा.स्थायी समिती मनपा यांचेकडेस सादर करणे. योग्य मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मॅके.इंजि. समक्ष चर्चा करा., समक्ष चर्चा केली मॅके.इंजि. यांच्या शिफारसीनुसारचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सीना नदी पात्रामधील महानगरपालिकेचे मालकीच्या विहीरीमधून पाणी देणेस परवानगी देणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- ही सापडली तर मालकी लावून घ्यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- नाव लावून घ्यावे.

मा.श्री.दिप चव्हाण :- मालकी आपली राहिल व मनपाच्या हिताचे अटी शर्ती टाका का ? रॉयल्टी घेता का ?

मॅके. इंजि. श्री. निकम :- होय.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- श्री. निकम, मॅके.इंजि. माहिती सांगा.

मॅके.इंजि. श्री. निकम :- यांच्याकडून दर घेतो ना ? मिटर प्रमाणे दर घेतो.

मा.श्री.दिप चव्हाण :- किती घेता.

मेकॅ.इंजि.श्री. निकम :- ३० पैसे लिटर मिटरप्रमाणे

मा.सभापती साहेब :- पिंपळगावला तलावातले पाणी घ्यायला परवानगी दिली का ?

मॅके.इंजि.श्री. निकम :- ११ महिने

मा.श्री. अजिंक्य बारेकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावा.

**ठराव :-** अर्जदार श्री. भागवत विश्वनाथ व्यवहारे, श्री. विलास भाउसाहेब लामखेडे , रा. निंबळक ता.नगर, जि.अ.नगर यांना सीना नदी पात्रामधील महानगरपालिकेचे मालकीच्या विहीरीमधून पाणी देणेस परवानगी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. रिपोर्टमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीसह करारनामा करून घेण्यात यावा. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.अजिंक्य बारेकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ४३ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ४३ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती ठराव क्र. १३ दि.२/६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग जा.क्र.५४ दि.१९/६/२०१४

संदर्भ-मा.स्थायी समिती सभा क्र.२ विषय क्र. १३ दि.०२/०६/२०१४ अन्वये पारित करण्यात आलेला ठराव

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगाव स.नं.३४ येथील कचरा डेपोच्या ठिकाणी कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व विल्हेवाट करणे करीता महानगरपालिके मार्फत Expression of interest मागविण्यात आले होते. सदर बाबत मनपाकडेस पार्श्व एन्टरप्राईजेस, पुणे या एजन्सीचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर केला असता दि.०२/०६/२०१४ रोजी झालेल्या स्थायी समितीने विषय क्र.१३ बाबत खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत ऑफिस रिपोर्टावर झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

वाटाघाटी स्थायी समिती समोर करा व याकरीता पुढील सभेमध्ये हा विषय घेईल त्या दिवशी समक्ष वाटाघाटी करण्याकरीता प्रकल्प विभागाने समितीच्या सभेमध्ये संबंधित एजन्सीला उपस्थित ठेवण्याची व्यवस्था करावी. तोपर्यत हा विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.

सदरचा ठराव प्रकल्प विभागास दि.१८/६/२०१४ रोजी प्राप्त झाला आहे. प्राप्त ठरावानुसार पार्श्व एन्टरप्राईजेस, पुणे यांना स्थायी समितीमध्ये वाटाघाटी करीता उपस्थित रहाणे बाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तरी सदरचा विषय पुढील सभेमध्ये निर्णयास्तव घेणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

येणेप्रमाणे उपायुक्त (कर) साहेब यांचे पत्र

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्ती प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- संबंधीत ठेकेदाराला बोलवा.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- ३३१ रूपये प्रति मेट्रीक टन प्रोसेसींग व डिस्पोजलसाठी दर संबंधीत ठेकेदाने दिला होता परंतू छाननी समिती मध्ये ३११ प्रती मेट्रीक टन या दरास तयारी दर्शवली.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- कचरा किती मेट्रीक टन निर्माण होते.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- दररोज १२५ मेट्रीक टन निर्माण होतो.परंतू मनपा.मार्फत १००मे.टन कच-याची डेपोपर्यंत वाहतूक करण्यात येते. पूर्ण क्षमतेने संकलन व वाहतूक केल्यास १२५ मे.ट.जमा होउ शकेल.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- हे संकलन आकडे जर तर आहेत.

मा.श्री. दिप चव्हाण :- त्यांच्या आपल्या रेटमध्ये फरक किती पडतो.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- साधारण रूपये शंभर फरक पडतो.

मा.श्री. दिप चव्हाण :- एवढा फरक येत असेल तर देण्याचा आम्हाला अधिकार नाही.

ठेकेदार प्रतिनिधी :- मुनष्यबळ, कच-याची विल्हेवाट यासाठी आम्ही रू.३३१/- ची डिमांड केली.

मा.सभापती साहेब व मा.श्री. बाळासाहेब बोराटे व मा.श्री. दिप चव्हाण :- आम्ही ऑफिस रिपोर्ट बाहेर जाउन दर इतका कमी करून मंजूर करू शकत नाही. तुम्ही मशिनरी बाहेरून आणणार का ?

मा.श्री. दिप चव्हाण :-मशीनरी ॲप्रुव्हड आहेत का. कुठे बसविली आहेत.

ठेकेदार प्रतिनिधी :- कंपनी माझ्या स्वतःची आहे. बार्शीचा प्रकल्प चालू आहे. नाशिकला चालू आहे. दरा बाबत विचार करण्यास थोडा वेळ द्या, आम्ही दरा बाबत लगेच सांगतो.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- आधी समक्ष प्रकल्प पहा. मगच ठरवा.

मा.श्री.दिप चव्हाण :- बार्शीचा प्रकल्प कमी क्षमतेचा आहे. आपला १२५ टन कचरा आहे. कचरा आहे लाईटबील आहे.

मा.प्र.आयुक्त श्री.बेहेरेः-कचरा आपण पोहोच करणार, बांधकाम आपण करायचे, ठेकेदार चालवणार आहेत. लाईट बील ठेकेदारानेच भरावयाचे,कच-याची प्रक्रीया व विल्हेवाट ते लावणार.

ठेकेदार प्रतिनिधी :- प्रशासनाच्या दरानुसार आम्ही काम करण्यास तयार आहोत.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ठेकेदाराच्या प्रकल्पाची पहाणी करण्याकरीता श्रीवर्धन ला व बार्शीला जावे व नंतर निर्णय घ्या.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- पहाणी करून ठरवा.

मा.सभापती साहेब :- जेथे या ठेकेदारांचे प्रकल्प चालू आहेत तेथे जाउन पाहणी करण्यात यावी.चर्चा करू. पुढील सभेत निर्णय घेउ. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** मा.स्थायी समिती ठराव क्र. १३ दि.२/६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, जेथे या ठेकेदारांचे प्रकल्प चालू आहेत तेथे जाउन पाहणी करण्यात येईल.चर्चा करू.प्रशासनाने ठरवलेले दर ठेकेदारास मान्य असल्याने प्रकल्पांची पाहणी करून पुढील सभेत निर्णय घेण्यात येईल.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सचुक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बारेकर सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक :- ४**

विषय क्रमांक- ४४ मंगळवार दि. ८/७/२०१४

ठराव क्रमांक- ४४ मंगळवार दि. ८/७/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून ॲडव्होकेट यांची दरमहा माधनावर पॅनलवर नेमणूकी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की ,१] ॲड. श्री. प्रसन्ना एम.जोशी यांनी दि.१७/५/२०१४ रोजी , २]ॲड वाडेकर धर्येशिल लक्ष्मण यांनी दि.६/२/२०१४ रोजी मा. महापौर साहेब यांचेकडे मनपाच्या पॅनलवर कायदेशीर सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत विनंती केलेली आहे. सदर अर्जावर स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करणेबाबत सूचित केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत मा. न्यायालयामधील दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून सद्यस्थितीमध्ये खालील प्रमाणे ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर नियुक्ती असुन माहिती बाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ .क्र | विधीतज्ञ यांचे नाव | मा.स्था.स.ठ.नं. व दिनांक | नियुक्ती आदेश क्रमांक व दिनांक | कालावधी व सद्यस्थिती मधील मानधन | कामकाजाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| १ | ॲड. श्री.एस.के. पाटील | ------ | कोर्ट विभाग जा.क्र.४६४, दि.१३/८/२००३ | दि.१३/८/२००३ पासून पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थिती मध्ये दरमहा मानधन रू.१२,०००/- | मा.औदयोगिक न्यायालय व कामगार न्यायालय |
| २ | ॲड.श्री.व्ही. एस.बेंद्रे | मा.स्था.स.ठ.नं. ३९ दि.३१/७/२००९ | जा.क्र.आस्था. १३८५ दि.१/८/२००९ | दि.१/८/२००९ पासून पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थिती मध्ये दरमहा मानधन रू.१२,०००/- | मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ |
| ३ | ॲड.श्री.किशोर एन.लोखंडे | मा.स्था.स.ठ.नं. ३९ दि.३१/७/२००९ | जा.क्र.आस्था. १३८५ दि.१/८/२००९ | दि.१/८/२००९ पासून पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थिती मध्ये दरमहा मानधन रू.१२,०००/- | मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ |
| ४ | ॲड.श्री.प्रतिक प्रकाश कोठारी | मा.स्था.स.ठ.नं. २८ दि.२३/५/२०१२ | जा.क्र.आस्था. १३६७ दि.१५/०६/२०१२ | दि.१८/६/२००९ पासून पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थिती मध्ये दरमहा मानधन रू.१२,०००/- | मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | ॲड.श्री.शशीकांत बापुराव रकटे | मा.स्था.स.ठ.नं. २८ दि.२३/५/२०१२ | जा.क्र.आस्था. १३६८ दि.१५/०६/२०१२ | दि.१८/६/२००९ पासून पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थिती मध्ये दरमहा मानधन रू.१०,०००/- | मा.दिवाणी फौजदारी न्यायालय , अहदमनगर |
| ६ | ॲड.श्री. मंगेश वसंतराव दिवाणे | मा.स्था.स.ठ.नं. २८ दि.२३/५/२०१२ | जा.क्र.आस्था. १३६८ दि.१५/०६/२०१२ | दि.१८/६/२००९ पासून पुढील आदेश होईपर्यत सद्यस्थिती मध्ये दरमहा मानधन रू.१०,०००/- | मा. दिवाणी फौजदारी न्यायालय , अहदमनगर |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेले आहे.

**५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे- मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहीत असेल.

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल. मात्र, कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल.

परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कालम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही असे नमुद केलेले आहे.

संबंधितांनाच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या पॅनलवर कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) ॲडव्होकेट म्हणुन दरमहा मानधनावर नेमणूक करणेबाबत निर्णय झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३(३) नुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पुर्व मंजुरी करीता निर्णयास्तव पाठविणेस व त्याप्रमाणे मा.स्थायी समितीच्या ठरावाच्या अनुषंगाने सदर प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर वर्तमान पत्रामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या दाव्या संदर्भात मा. न्यायालयामध्ये कामकाज पहणेसाठी नव्याने विधीतज्ञ (ॲडव्होकेट) यांची दरमहा मानधनावर नियुक्ती करीता मुलाखतीसाठी थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार जाहिरात प्रसिध्दीस द्यावी लागेल.

तद्नंतर सदर प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने मा.निवड समितीमार्फत उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन निवड झालेल्या ॲडव्होकेट यांची यादी नोटीस फलकावर प्रसिध्द करून त्याप्रमाणे निवड झालेल्या ॲडव्होकेट यांची नव्याने दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत नियुक्ती आदेश निर्गमित करावा लागेल व त्याच वेळेस यापुर्वी कार्यरत विधीतज्ञ पैकी दरमहा मानधनावरील केलेल्या यापुर्वीची नियुक्ती संपुष्टात येत असल्याबाबतचा आदेश संबंधितांना निर्गमित करावा लागेल. सदरची वरील विहीत पध्दतीची प्रक्रिया ही एकाच वेळेस होणे तांत्रिक दृष्टया योग्य होईल.

उपरोक्त प्रकरणी आर्थिक व धोरणात्मक बाब असल्याने याबाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन याबाबत निर्णय होणे उचित वाटते.

सन २०१४-२०१५ या अंदाजपत्रकामध्ये मानधन या लेखा शिर्षाखाली रू.५६,१०,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त संबंधीतांच्या अर्जाच्या अनुषंगाने व सदरच्या अर्जावर मा.महापौर साहेब यांनी सुचित केल्यानुसार सदर प्रकरणी अहमदनगर महानगरपालिकेमध्ये नव्याने (विधीतज्ञ) ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत नियुक्ती बाबत निर्णय झाल्यास उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखतीसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवून मा.निवड समिती मार्फत उमेदवारांच्या मुलाखती घेवून विहीत पध्दतीने कार्यवाही करणे बाबतच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव हा मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणेसाठी मंजुरी करीता आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सन २०१४-२०१५
अंदाजपत्रकीय तरतुद
लेखाशिर्ष- मानधन
एकुण तरतुद- रू. ५६,१०,०००/-
झालेला खर्च- रू. ९,९७,००१/-
---------------------------
शिल्लक तरतुद रू.४६,१२,९९९/-

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.अ. आणि मु.ले.प. यांचा अभिप्राय घेणे

यावर मु.ले.अधिकारी यांचा अभिप्राय की,आस्थापना प्रमुख यांच्या अहवालाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीत मान्य करण्यास हरकत नसावी.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, सद्यस्थितीत कार्यरत ६ विधीतज्ञापैकी ज्यांना कायम ठेवायचे किंवा कमी करावायाचे अनेक त्याकरीता मे.स्थायी समितीच्या मान्यता घेणे आवश्यक आहे. ज्यांना ६ महिनेपेक्षा जास्त कालावधीकरीता नियुक्ती करावयाची त्याबाबीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(३) नुसार मे.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक राहील. मे. "अ" नुसार आदेशार्थ सविनय सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मागील प्रमाणे नेमणूक झालेले विधीतज्ञ यांचे फेरविचार करणे व काही विधीतज्ञांच्या नव्याने नेमणूक करणेच्या दृष्टीने विषय मे.स्थायी समिती समोर ठेवावे.

--००--

फेरसादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पॅनलवर नेमणूकी बाबतचा प्रस्ताव निर्णयाकरीता मा.स्थायी समितीकडे जा.क्र.आस्था./वर्क. २४८१दिनांक ३०/६/२०१४ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर पाठविलेल्या प्रस्तावावर दिनांक ०१/०७/२०१४ रोजी मा.सभापती साहेब स्थायी समिती अहमदनगर महानगरपालिका यांनी समक्ष बोलावून झालेल्या चर्चे दरम्यान सदर प्रकरणामधील संबंधितांच्या अर्जावरील मा.महापौर साहेब यांनी सुचित केल्याप्रमाणे सद्यस्थितीमध्ये इतर अर्ज असल्यास या प्रस्तावावर फेरप्रस्ताव सादर करून तात्काळ मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणे बाबत सुचित केलेले आहे.

याबाबत ॲड. अनिता व्ही. दिघे, केडगाव, अहमदनगर यांनी दिनांक १९/०५/२०१४ रोजी अर्ज देवुन तसेच ॲड. तुळशीराम एकनाथ बाबर, यांनी दिनांक ४/७/२०१४ रोजी अर्ज देवुन व ॲड. मंगला राजेश कोठारी , रा. अभिजीत , मुनोत इस्टेट स्टेशन रोड, अहमदनगर यांनी दिनांक ४/७/२०१४ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा.जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे असलेल्या दाव्या संदर्भात कामकाज पहाणेसाठी पॅनलवर ॲडव्होकेट (विधीतज्ञ) कायदेशीर सल्लागार म्हणून नियुक्ती करणेबाबत नमुद करून विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर मा.महापौर यांनी मे.स्थायी समिती समोर ठेवणेसाठी प्रस्ताव सादर करा असे निर्देशित केलेले आहे.

तथापी दरम्यानच्या काळात श्री. शरद सुरेशराव पंचमुख, सिव्हील हॉस्पीटल जवळ, अहमदनगर यांनी दि.२५/६/२०१४ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये सुमारे ७-८ महिन्यापुर्वी ॲड. अनिता दिघे यांनी आंदोलन करून मनपाच्या नव्या कार्यालयाची नासधुस केली असल्यामुळे त्यांच्यावर मनपाने गुन्हा दाखल केलेला होता. असे नमुद करून ॲड. अनिता दिघे यांना मनपाचे वकील या पदावर नेमणूक न करणे बाबत तक्रार केलेली आहे.

सदरच्या तक्रारी अर्जावरील अनुषंगाने संबधीत यांचे विरूध्द मनपामार्फत गुन्हा दाखल झालेला आहे किंवा कसे याबाबत सविस्तर अहवाल सादर करणेबाबत मा.सहाय्यक आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, अ.नगर म.न.पा. यांना इकडील जा.क्र.आस्था.२४५१ दि.२७/६/२०१४ अन्वये पत्र देण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने मा.सहाय्यक आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी त्यांचे कडील जा.क्र.साप्रवि ४०२ दिनांक ३०/६/२०१४ अन्वये इकडेस पत्र देवुन सदर प्रकरणी कार्यवाही बाबतच्या छायांकित प्रती जोडून पाठविण्यात आलेल्या आहेत.

सदर पत्रासोबत जोडण्यात आलेल्या छायांकित प्रती पाहता त्यामध्ये सदर प्रकरणी तोफखाना पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे याबाबत क्र.I३५४/२०१३ दिनांक ७/८/२०१३ अन्वये FIR दाखल करण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी संबंधीताच्या अर्जाच्या अनुषंगाने व सदरच्या अर्जावर मा. महापौर साहेब यांनी सुचित केल्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये नव्याने (विधीतज्ञ) ॲडव्होकेट यांची दरमहा मानधनावर पुढील आदेश होईपर्यत नियुक्ती बाबत निर्णय झाल्यास उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखतीसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन मा. निवड समिती मार्फत उमेदवारांच्या मुलाखती घेवुन विहीत पध्दतीने कार्यवाही करणे बाबतच्या प्रस्तावावर मा.लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवुन मंजुरी करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविणेसाठी निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सन २०१४-२०१५
अंदाजपत्रकीय तरतुद
लेखाशिर्ष- मानधन
एकुण तरतुद- रू. ५६,१०,०००/-
झालेला खर्च- रू. ९,९७,००१/-
--------------------------
शिल्लक तरतुद रू.४६,१२,९९९/-

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.अ. तसेच मु.ले.प. यांचा अभिप्राय घेणे
यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीत
यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा सहमती दर्शक सही
यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मे.स्थायी समिती सभेत विषय घेणेबाबत आदेशार्थ सादर.
यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मे. स्थायी समिती सभेत घेणेत यावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीतज्ञ) म्हणून ॲडव्होकेट यांची पॅनलवर नेमणूकी विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. सचिन जाधव :- अर्ज कोणाकोणाचे आहे ते वाचा.

आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- ॲड. धैर्यशील वाडेकर, ॲड. प्रसन्ना जोशी हे दोन अर्ज आले. ॲड. मंगला कोठारी, ॲड.अनिता दिघे , ॲड. तुळशीराम बाबर, असे अर्ज आले आहेत. पाचही अर्जावर महापौर साहेब यांनी शेरे मारून पाठवले आहेत.संपुर्ण रिपोर्ट वाचन केले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे व मा.श्री. सचिन जाधव :- यापुर्वी कोण वकील होते.

आस्थापना प्रमुख श्री.खोलम :- ॲड.व्ही.एस.बेद्रे ,ॲड.किशोर लोखंडे , ॲड. प्रतिक कोठारी हे उच्च न्यायालयात काम पहातात. ॲड. एस.के.पाटील मा.औद्योगिक न्यायालय, मा.ॲड.श्री.मंगेश दिवाणे, व ॲड.श्री.रकटे अहमदनगर न्यायालय.

मा.सभापती साहेब :- किती अर्ज आले.

आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- पाच आले.

मा.सभापती साहेब :- नियुक्ती कशी करतात.

मा.श्री.दिप चव्हाण :- नियुक्तीची प्रोसेस कशी आहे ते सांगा.

आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- पॅनल नियुक्ती करावयाची असल्यास जाहीरात द्यावी लागेल, अर्ज घ्यावे लागतील. मुलाखती घेवून नियुक्ती करावी लागेल. स्थायी समिती मार्फत नियुक्ती होते.

मा.सभापती साहेब :- या प्रकरणात दिघे यांच्या बाबत काही अर्ज आले आहेत का.

आस्थापना प्रमुख श्री. खोलम :- पंचमुख यांनी दिघे यांनी मनपा कार्यालयाची नासधुस केल्याने त्यांना नियुक्ती देउ नये असा अर्ज केला आहे.

मा.सभापती साहेब :- प्रलंबित दावे किती ? एवढे लोकांची गरज आहे का ?

मा. प्र.आयुक्त श्री. बेहेरे :- दिवाणी ६९६ दावे प्रलंबित १४९ टॅक्स अपील उच्च न्यायालयात ११८ दिल्लीला १ प्रलंबित वकील लोकांची मुलाखत घेउन त्यांची नेमणूक करावी लागेल.

मा.सभापती साहेब :- पुर्वीच्या नेमणूका कशा केल्या आहेत.

आस्थापना प्रमुख श्री.खोलम :- ॲड.श्री.एस.के.पाटील यांची प्रशासकीय ठराव घेवून नियुक्ती केली आहे. व इतर ॲडव्होकेट यांची स्थायी समितीच्या ठरावाने नेमणुक केली आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- प्रोसेस करून नेमणूक करा.

मा.श्री. सचिन जाधव :- काम भरपूर आहे. नेमणूक करा.

मा.सभापती साहेब :- यापुर्वी जाहीरातीची प्रोसेस केली नाही. मग आत्ताच जाहीरात का.

आस्थापना प्रमुख श्री.खोलम :- त्यावेळीही रिपोर्ट असाच केला होता. पण स्थायी समितीने निर्णय घेतला.

मा.सभापती साहेब :- म्हणजे स्थायी समितीच्याच निर्णयाने नियुक्ती केली होती.

मा.श्री.दिप चव्हाण :- मा.उच्च न्यायालयातले ८२ दावे कसे कव्हर करणार. त्यासाठी दोन वकील स्वतंत्र नेमा.

मा.सौ. सुनिता कांबळे :- औद्योगीक न्यायालय व कामगार न्यायालयाचे काम करणारे वकील देखील बदला.

मा.सभापती साहेब :- एवढे दावे जर प्रलंबित असतील तर ५ वकील आवश्यक आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- रिपोर्ट पाहता वकील ठेवणे,कमी करणे अथवा नव्याने नियुक्ती करणे याचे सभापतींना अधिकार दया.

मा.सभापती साहेब :- मा.सभापती स्थायी समिती यांना याबाबतचे अधिकार देण्यांत येत आहेत.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- सभापती साहेब ठरावाचे रुलिंग द्या.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- मा.सभापती स्थायी समिती यांना याबाबतचे अधिकार देण्यांत येत आहेत.

मा.सभापती साहेब :- मला प्राप्त अधिकारा नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या ॲडव्होकेट पॅनलवरील मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर, आणि मा.औद्योगिक न्यायालय व कामगार न्यायालय, अहमदनगर येथील काम पहाणारे विधीज्ञ यांची मानद नियुक्ती संपुष्टात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे. मा.ॲडव्होकेट पॅनलवर एकुण ५ वकीलांच्या नेमणुका पुर्वीच्या मानधनावर करण्यात याव्यात. महानगरपालिकेच्या कामकाजासाठी ॲड. प्रसन्ना जोशी, ॲड. मंगला कोठारी, ॲड. तुळशीराम बाबर, ॲड. धैर्यशील वाडेकर, ॲड.अनिता दिघे यांची मानद नियुक्ती करण्यांत यावी. तसेच मा उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद येथील कामकाजासाठी कार्यरत असलेले मानद विधीज्ञ यांची मानद नियुक्ती रद्द करावी. त्यांचेकडील असलेले महानगरपालिकेचे कामकाज मानद विधीज्ञ ॲड.किशोर लोखंडे यांचेकडेस देण्यात यावेत. सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने मा. न्यायालयामध्ये दाव्या संदर्भात कामकाज पहाणे करीता कायदेशीर सल्लागार (विधीज्ञ) म्हणून ॲडव्होकेट यांची दरमहा माधनावर पॅनलवर नेमणूकी बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

१) मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय अहमदनगर, आणि मा.औद्योगिक न्यायालय व कामगार न्यायालय, अहमदनगर येथील काम पहाणारे विधीज्ञ यांची मानद नियुक्ती संपुष्टात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२] मा.ॲडव्होकेट पॅनलवर ॲड. धैर्यशील वाडेकर, ॲड. प्रसन्ना जोशी, ॲड. मंगला कोठारी, ॲड. तुळशीराम बाबर, ॲड.अनिता दिघे यांची यापुर्वीच्या मानधनानुसार (प्रती मानद विधीज्ञ रक्कम रु.१०,०००/- प्रमाणे) मानद विधीज्ञ म्हणुन नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

३) मा उच्च न्यायालयाच्या खंडपीठ औरंगाबाद येथील कामकाजासाठी कार्यरत असलेले मानद विधीज्ञ यांची मानद नियुक्ती संपुष्टात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पुढील व्यवस्था होईपावेतो मानद विधीज्ञ ॲड.किशोर लोखंडे यांचे स्वतःकडील कामकाजासह संपुर्ण कामकाज देण्यास मान्यता देण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका